रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | सोमवार । दि. ८ जून २०२६ । अंक २ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## बांबूच्या दांडक्याने मारहाण

**रेवदंडा :** रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील सुडकोली येथे जुन्या जागेच्या कुंपणाच्या वादातून एका ज्येष्ठ नागरिकासह त्यांच्या पत्नीला बांबूच्या दांडक्याने मारहाण केल्याची घटना ६ जून रोजी दुपारी सुमारे १.४५ वाजता घडली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दशरथ म्हात्रे (६०) हे सुडकोली बस स्टॉप येथे एस.टी. बसची प्रतीक्षा करत बसले असताना त्यांच्या शेजारी सुदर्शन पाटील तेथे आले. मागील जागेच्या कुंपणाच्या वादाचा राग मनात धरून पान २ वर

## मुंबई-पुणे महामार्गावर कोंडी

**खोपोली :** मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने प्रवाशांचे हाल झाले. कामशेत, कार्ला फाटा, मळवली तसेच लोणावळ्यातील विविध भागांत वाहनांच्या तीन ते चार किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे वाहतुकीचा वेग अत्यंत मंदावल्याने पर्यटक, भाविक आणि स्थानिक नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो आहे. रविवारची सुट्टी आणि उन्हाळी सुट्ट्यांचा शेवटचा टप्पा यामुळे लोणावळा परिसरात पर्यटक आणि भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. तसेच कार्ला येथील एकवीरा देवी मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते.

# सर्वसामान्य पुन्हा गॅसवर

### घरगुती सिलिंडर २९ रुपयांनी महागला
### तीन महिन्यांत ८९ रुपयांची वाढ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**वाढत्या महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा एकदा झळ बसली आहे. घरगुती वापराच्या १४.२ किलो वजनाच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली असून, नवे दर रविवार (दि. ७)पासून लागू झाले आहेत. गेल्या तीन महिन्यांतील ही दुसरी दरवाढ असल्याने घरगुती बजेटवरील ताण आणखी वाढणार आहे.**

तेल विपणन कंपन्यांनी जाहीर केलेल्या नव्या दरानुसार मुंबईत घरगुती गॅस सिलिंडरची किंमत ९१२.५० रुपयांवरून ९४१.५० रुपयांवर पोहोचली आहे. तर, दिल्लीत सिलिंडरचा दर ९१३ रुपयांवरून ९४२ रुपयांपर्यंत वाढला आहे. विविध राज्यांमधील कर आणि वाहतूक खर्चामुळे दरांमध्ये किरकोळ फरक असू शकतो.

यापूर्वी ७ मार्च रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा २९ रुपयांची वाढ झाल्याने अवघ्या तीन महिन्यांत सिलिंडर तब्बल ८९ रुपयांनी महागला आहे. त्यामुळे आधीच महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या कुटुंबांचे मासिक बजेट आणखी कोलमडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पेट्रोल, डिझेल, अन्नधान्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिक मेटाकुटीला आले असताना स्वयंपाकघराचा




खर्चही वाढल्याने चिंता अधिक गडद झाली आहे.

विशेषतः मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांना या दरवाढीचा मोठा फटका बसणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती, कच्च्या तेलाच्या पान २ वर

### दुसऱ्यांदा दरवाढीने बजेट कोलमडणार

७ मार्च रोजी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आता २९ रुपयांची वाढ झाल्याने अवघ्या तीन महिन्यांत सिलिंडर ८९ रुपयांनी महागला आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ सर्वसामान्यांसाठी चिंतेची बाब ठरत आहे.

### मुंबईत सिलिंडर ९४१.५० रुपयांवर

नव्या दरांनुसार मुंबईत १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत ९१२.५० रुपयांवरून ९४१.५० रुपये झाली आहे. तर दिल्लीत हा दर ९४२ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. राज्यनिहाय कर आणि वाहतूक खर्चामुळे दरांमध्ये थोडाफार फरक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांनो, पेरणीची घाई टाळा!

### १५ जूनपर्यंत पेरणीयोग्य पावसाची शक्यता कमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात मान्सूनने दक्षिण कोकणात हजेरी लावली असली तरी त्याची प्रगती अद्याप संथ आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांत ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यभर पावसाचा जोर कमी राहण्याची तसेच मान्सूनची वाटचाल मंदावण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकऱ्यांना पेरणीबाबत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. १५ जूननंतरच बहुतांश भागांत पेरणीयोग्य पावसाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने पुरेसा आणि सातत्यपूर्ण पाऊस होईपर्यंत पेरणीची घाई करू नये, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

सध्याच्या अंदाजानुसार विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत पुढील काही दिवस दुपारनंतर ढगाळ वातावरणासह मेघगर्जना आणि वादळी पावसाच्या विखुरलेल्या सरी पडू शकतात. मात्र, हा पाऊस व्यापक स्वरूपाचा नसल्याने खरीप हंगामातील पेरणीसाठी अनुकूल वातावरण तयार होण्याची शक्यता कमी आहे. पान २ वर

## कंपनीत घुसून चौघांचा गोंधळ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यापूर्वी नाल्यांच्या साफसफाईचे काम पूर्ण केले नाही. याबाबत विचारणा केल्याचा राग धरून महिलांसह चौघांनी कंपनीत गोंधळ घातला. शिवीगाळी करून विनयभंगाची तक्रार करणार असल्याची धमकी कंपनीतील अधिकाऱ्याला देण्यात आली. कंपनीत घुसून गोंधळ घालणाऱ्या आणि धमकी देणाऱ्या तसेच चिथावणी करणाऱ्या पाच जणांविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. ही घटना गुरुवारी दुपारी कंपनीतील इस्टेट ऑफिसमध्ये घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार, रमेश धनावडे असे तक्रारदार यांचे नाव आहे. तक्रारदार हे पान २ वर

## कृषीवलचा वर्धापन दिन उत्साहात साजरा



• (छायाचित्र : गणेश पाटील/समीर मालोदे)

• अधिकचे वृत्त/छायाचित्र पान ३/८ वर







# नद्या आटल्या, पनवेलमध्ये पाणीटंचाई



। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून तापमान वाढल्याने पाणीपातळी झपाट्याने घटू लागली आहे. येथील नद्या आटल्याने मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे अनेकांना विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

२०२५ मध्ये जवळपास सहा महिने पाऊस झाला. नोव्हेंबर महिन्यापर्यंत पाऊस असल्याने नदीपत्रांमध्ये अधिक काळ पाणी साचून राहील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. तसेच थंडीचे वातावरण देखील चांगले असल्याने नद्यांमधील पाणीसाठा टिकून होता. मात्र मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून तालुक्यात तापमान वाढण्यास सुरुवात झाली आणि नद्यांच्या पाणी पातळीत कमालीची घट झाली. त्याची झळ नागरिकांना बसत आहे. सध्या जून महिना उजाडला असून पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे नद्यांमधील पाणी मोठ्या प्रमाणात आटले आहे. बहुतांश ठिकाणी नदीचे पात्र कोरडे झालेले आहेत. नदीच्या पाणी पातळीवर अनेक गावातील विहिरींची पातळी अवलंबून असते. आदिवासी भागातील विहिरींचे पाणी देखील आटले आहे. अनेक आदिवासी बांधवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.

पनवेल तालुक्यात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे मात्र त्यांना पाणीपुरवठा करणारी साधने कमी पडत आहेत. काही ठिकाणी खोदण्यातयेणाऱ्याबोरवेललादेखील पाणी लागत नाही. तालुक्यातील अनेक विहिरी, बोअरवेल आणि नद्या कोरड्या पडल्याने नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. तर काही ठिकाणी स्थानिकांना पहाटे इतर भागातून पाणी आणावे लागत असून काहींना पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.

# पाली शहरात अवजड वाहतुकीस बंदी

। सुधागड–पाली । प्रतिनिधी ।

पाली नगरपंचायतीने केलेल्या ठरावानुसार आणि नागरिकांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हाधिकारी किशन ना. जावळे यांनी पाली शहरातील मार्गांवर सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत सर्व प्रकारच्या अवजड वाहन वाहतुकीस बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत.

पाली हे अष्टविनायकातील श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिराचे तीर्थक्षेत्र असून दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. अरुंद रस्त्यांवरून अवजड वाहतूक सुरू असल्याने वाहतूक कोंडी, ध्वनी व वायू प्रदूषण, अपघाताचा धोका तसेच सार्वजनिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर पाली नगरपंचायतीने सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक १९७ दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मंजूर करून अवजड वाहतुकीवर बंदीची मागणी केली होती.

नगरपंचायतीच्या या ठरावाला प्रतिसाद देत जिल्हाधिकाऱ्यांनी अधिसूचना काढली असून दुध,



> जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधित खात्यांनी तातडीने दखल घेऊन आदेशाची अमलबजावणी लवकरात लवकर व्हावी. पाली नगरपंचायतीने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी घेतलेला ठराव आता प्रत्यक्षात उतरला असून, हा निर्णय पालीकरांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.
> – पराग मेहता, नगराध्यक्ष, पाली नगरपंचायत

पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी यांसारख्या जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना मात्र या बंदीपासून सूट देण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, स्थानिक नागरिक, भाविक, शाळकरी विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि पर्यटक यांच्या सुरक्षिततेसाठी ही बंदी आवश्यक आहे.

या निर्णयाचे श्रेय पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांना जाते. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच जिल्हाधिकाऱ्यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

# जून उजाडला; शाळांच्या घंटानादाची प्रतीक्षा

। पनवेल । प्रतिनिधी ।

जून महिना सुरू झाला असून, राज्य शासनाकडून येत्या २६ जूनपासून शाळा सुरू करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, यंदा वाढलेल्या तापमानामुळे विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही पावसाच्या आगमनाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस उरले असल्याने पनवेल शहरातील बाजारपेठांमध्ये शालेय साहित्य खरेदीसाठी मोठी गर्दी होताना दिसत आहे.

विद्यार्थ्यांसाठी नवीन शालेय गणवेश, दप्तर, वह्या, पुस्तके, पाण्याच्या बाटल्या तसेच पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट आणि छत्र्या खरेदी करण्यात पालक व्यस्त आहेत. शहरातील कपडे व शालेय साहित्य विक्रेत्यांकडे सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ वाढली आहे.



दरम्यान, शालेय गणवेशांच्या किमतीत यंदा कोणतीही मोठी वाढ करण्यात आलेली नसल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. कापड व शिवणकामाचा खर्च वाढला असला तरी पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, यासाठी मागील वर्षीप्रमाणेच दर ठेवण्यात आल्याचे दुकानमालकांचे म्हणणे आहे. याबाबत पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शाळा सुरू होण्याच्या उत्साहात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत असून, आता सर्वांनाच प्रतीक्षा आहे ती पावसाच्या पहिल्या सरींसह शाळेच्या पहिल्या दिवसाची. पनवेल बाजारपेठेत सध्या शालेय खरेदीला चांगलाच वेग आला असून, पुढील काही दिवसांत ही गर्दी आणखी वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.



(छायाचित्र :धम्मशील सावंत)

# शिवराज्याभिषेक दिनी रायगडावर पोलिसांचा जल्लोष

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त किल्ले रायगडावर आयोजित कार्यक्रम शांतता व सुरक्षितता राखून यशस्वी व्हावा यासाठी रायगड सह कोकण परीक्षेत्रातील पोलिसांनी अपार कष्ट व मेहनत घेतली. शिवराज्याभिषेक सोहळा यशस्वी पार पडल्यानंतर रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्यासह पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे जल्लोष साजरा केला. ''शिवबा राजे छत्रपती झालं गं'' या गाण्यावर पोलीस कर्मचारी व अधिकारी बेधुंद होऊन नाचल्याचे पाहायला मिळाले.

शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने रायगड किल्ल्यावर मोठ्या प्रमाणात भाविक आणि शिवप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरक्षेसाठी मागील तीन दिवसांपासून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जबाबदारी पार पाडताना पोलिसांनीही शिवराज्याभिषेकाचा आनंद व्यक्त करत जल्लोषात सहभाग घेतला.

दरम्यान, पोलिसांच्या या उत्स्फूर्त सहभागाचा व्हिडीओ रिल्स सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, नागरिकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# जिल्हा परिषद सदस्यावर जीवघेणा हल्ला

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे त्यांचे सहकारी प्रकाश जंगम, सोनालाल माली यांच्यावर अहिल्यानगर मधील रनगाव बायपास चौकात भरदिवसा गुरुवारी जीवघेणा हल्ला करण्यात आला.

हा हल्ला त्याच्याकडे गेली चार ते पाच वर्षे काम करणाऱ्या अक्षय मोहिते आणि राजू मोहिते या कामगारांना पुढील कामासाठी पैसे देण्यासाठी गेले असताना त्या दोघांनी तसेच त्यांच्या मित्राच्या साथीने जीवघेणा हल्ला करून दरोडा टाकला, असा आरोप नलावडे यांनी केला आहे. या हल्ल्यात जिल्हा परिषद सदस्यांच्या डोक्यावर लोखंडी सळईने वार केले आहेत तसेच त्याच्या सहकाऱ्याचा डोळा पूर्णपणे निकामी केला आहे. या सर्व जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या हल्लेखोराने सोन्याची चेन, ब्रेसलेट, अंगठी, असा एकूण पंधरा तोळे सोन्याचा ऐवज, मोबाईल तसेच पन्नास लाख रुपयांची रक्कम लंपास केली आहे. जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या हल्लेखोरांना लवकरात लवकर पकडून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.



पान १ वरून

## सर्वसामान्य पुन्हा गॅसवर

किमतीतील चढ–उतार आणि जागतिक पुरवठा साखळीवरील दबाव याचा परिणाम एलपीजीच्या दरांवर होत आहे. घरगुती गॅस विक्रीत तेल कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत असल्याने आगामी काळातही दरवाढीची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना अनुदानाचा काहीसा दिलासा मिळत असला तरी सर्वसामान्य ग्राहकांना वाढीव दरांचा थेट फटका बसणार आहे. त्यामुळे गृहिणींसह ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**व्यावसायिक गॅसलाही महागाईची झळ**

घरगुती गॅसपूर्वी व्यावसायिक वापराच्या १९ किलो एलपीजी सिलिंडरच्या दरातही १ जून रोजी ४२ रुपयांची वाढ करण्यात आली होती. जानेवारीपासून आतापर्यंत व्यावसायिक सिलिंडरच्या दरात मोठी वाढ झाली असून, त्याचा परिणाम हॉटेल, उपाहारगृहे आणि खाद्यपदार्थांच्या किमतींवरही दिसून येत आहे.

**गृहिणींचे बजेट बिघडले**

अन्नधान्य, भाजीपाला, दूध, पेट्रोल–डिझेल यानंतर आता गॅस सिलिंडर महागल्याने घरखर्चाचे गणित पुन्हा मांडावे लागणार आहे. वाढत्या खर्चामुळे गृहिणी आणि कुटुंबप्रमुखांमध्ये नाराजीचे वातावरण असून महागाईचा फटका आता थेट दोन वेळच्या जेवणापर्यंत पोहोचल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## बांबूच्या दांडक्याने मारहाण

आरोपीने फिर्यादी यांच्या पाठीमागून येत हातातील बांबूच्या दांडक्याने त्यांच्या पाठीवर व डाव्या हातावर वार केल्याचा आरोप आहे. मारहाणीदरम्यान दशरथ म्हात्रे यांनी स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला असता दांडक्याचा फटका त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्यालगतच्या बोटावर बसून दुखापत झाली. तसेच त्यांच्या पाठीवर आणि डाव्या डोळ्याजवळही मार लागल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

यावेळी फिर्यादी यांना वाचविण्यासाठी त्यांची पत्नी दर्शना म्हात्रे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपीने त्यांनाही कंबरेवर व उजव्या पायाच्या पोटरीवर बांबूच्या दांडक्याने मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या घटनेत दशरथ म्हात्रे आणि दर्शना म्हात्रे हे दोघेही जखमी झाले आहेत. मारहाणीनंतर आरोपीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीने केला आहे.

याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात सुदर्शन पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पोलीस हवालदार ठाकूर करीत आहेत.

## शेतकऱ्यांनो, पेरणीची घाई टाळा!

दरम्यान, राज्यातील अनेक भागांत उष्णतेचा चटका कायम राहणार असून, किमान १२ जूनपर्यंत कमाल तापमानात विशेष घट होण्याची शक्यता नाही. विदर्भ आणि खानदेशात तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे, तर मराठवाड्यात ते ३५ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान राहू शकते.

कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकरी आणि नागरिकांना आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणी न करण्याचा सल्ला दिला आहे. तसेच विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच वीज खांब, ट्रान्सफॉर्मर आणि विद्युत वाहिन्यांजवळ थांबणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मान्सूनच्या संथ प्रगतीमुळे आणि पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेमुळे राज्यातील बळीराजाची चिंता मात्र वाढली आहे.

## कंपनीत घुसून चौघांचा गोंधळ

रिलायन्स कंपनीत डेप्युटी जनरल मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. कंपनी हद्दीतील झोतीरपाडाकडे जाणाऱ्या नाल्यामधून पावसाळ्यापूर्वी गाळ व घाण मागील वर्षी २०२५ मध्ये काढायचा होता. हे काम झोतीरपाडा येथील प्रमोद तरे यांना दिले होते. कार्याध्यादेश असतानाही पावसाळ्यापूर्वी आणि नंतरही त्यांनी काम पूर्ण केले नाही. त्यामुळे कंपनीतील पी अँड सी विभागाने मागील महिन्यात बोलावून तरे यांना काम पूर्ण करण्यास सांगितले. तरीदेखील त्यांनी काम पूर्ण केले नाही. कंपनी व्यवस्थापनाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात आला. अखेर गुरुवारी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या संपर्क साधून इस्टेट ऑफिसमध्ये त्यांना एकट्याला भेटण्यास बोलावले होते. परंतु, ते आले नाही. मात्र, दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास इस्टेट ऑफिसमध्ये काम करीत असताना तीन महिलांनी अनधिकृतपणे कार्यालयामध्ये प्रवेश केला. धनावडे यांच्या केबीनमध्ये घुसून आरडाओरडीसह शिवीगाळी करू लागले. त्यानंतर धनावडे यांच्या अंगावर त्या महिला धावून येत होत्या. तसेच ठार मारण्याबरोबरच विनयभंगाची तक्रार करणार असल्याची धमकी त्यांना देत होत्या. त्याचवेळी राजेंद्र तरे यांनीदेखील येऊन शिवीगाळी आणि दमदाटी केली. प्रमोद तरे मोबाईलवर संपर्क साधून चिथावणी करीत होते. अनधिकृतपणे कार्यालयात घुसून दमदाटी शिवीगाळी करणे, गोंधळ घालणे, विनयभंग करणार असल्याची तक्रार दाखल करण्याची धमकी देणे याप्रकरणी प्रमोद तरे, राजेंद्र तरे, वरुणा तरे, रंजना तरे, सरिता तरे यांच्याविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात धनावडे यांनी तक्रार केली असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या मौजे - बाळसई, ता. रोहा, जि.रायगड येथील प्रत्यक्ष मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकती ह्या रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतींचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या शेत जमिन मिळकतींचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| अ.क्र. | मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | बाळसई | ४३/१/२ | जिरायत ०.३५.१०<br>पो.ख. ०.०४.९०<br>एकूण क्षेत्र ०.४०.०० | ६.१९ |
| २) | बाळसई | ४४/२ | वरकस ०.१५.००<br>पो.ख. ०.२०.००<br>एकूण क्षेत्र ०.३५.०० | ०.२८ |
| ३) | बाळसई | ५९ | वरकस ०.२६.००<br>पो.ख. ०.१५.००<br>एकूण क्षेत्र ०.४१.०० | ०.४१ |

**वरील अ.क्र. १ ते ३ मध्ये वर्णन केलेल्या शेत जमीन मिळकतींचे संपूर्ण क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनांच्या शेत जमीन मिळकतींचे संपूर्ण क्षेत्र हे पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरच्या वरील नमुद शेत जमीन मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरीलप्रमाणे नमुद केलेल्या शेत जमीन मिळकतींच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतींचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण-रायगड
दिनांक ०८/०६/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे - बाळसई, ता. रोहा, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बाळसई | १९७ | जिरायत ०.१६.६०<br>वरकस ०.४०.७०<br>एकूण ला. यो. क्षेत्र ०.५७.३०<br>एकूण पो.ख. ०.२६.८०<br>एकूण क्षेत्र ०.८४.१० | ४.१३ |

वरील शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी विद्यमान मालक श्री. विनोद गोपाळदास मेहरा यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील ०.२२.०० हे.आर.चौ.मी. (२२.०० गुंठे ) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची शेत जमीन मिळकत पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरची वरील नमुद शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरीलप्रमाणे नमुद शेत जमीन मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण रायगड
दिनांक ०८/०६/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे - बाळसई, ता. रोहा, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बाळसई | १९६ | जिरायत ०.०९.९०<br>वरकस ०.०४.००<br>एकूण ला. यो. क्षेत्र ०.१३.९०<br>एकूण पो.ख. ०.०१.००<br>एकूण क्षेत्र ०.१४.९० | ०.९९ |

वरील शेत जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ०.१४.९० हे.आर.चौ.मी. (१४.९० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची शेत जमीन मिळकत पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरची वरील नमुद शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरीलप्रमाणे नमुद शेत जमीन मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड
दिनांक ०८/०६/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे - बाळसई, ता. रोहा, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बाळसई | ७१/२ | जिरायत ०.२५.००<br>बागायत --<br>एकूण ला. यो. क्षेत्र ०.२५.००<br>एकूण पो.ख. ०.१५.००<br>एकूण क्षेत्र ०.४०.०० | ०.३९ |

वरील शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी विद्यमान मालक श्री. विनोद गोपाळदास मेहरा यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील ०.२०.०० हे.आर.चौ.मी. (२०.०० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची शेत जमीन मिळकत पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरची वरील नमुद शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरीलप्रमाणे नमुद शेत जमीन मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण रायगड
दिनांक ०८/०६/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे - बाळसई, ता. रोहा, जि. रायगड येथील सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सामाईक मालकीच्या शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्यामाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बाळसई | ३८/५ | वरकस ०.१८.४०<br>पो.ख. ०.०६.१०<br>एकूण क्षेत्र ०.२४.५० | ०.३८ |

वरील सामाईक मालकी असलेल्या शेतजमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ०.२४.५० हे.आर. चौ.मी. (२४.५० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाची सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीची शेतजमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील सामाईक मालकी असलेल्या शेतजमीन मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार हा रजि. खरेदीखताने पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण रायगड
दिनांक ०८/०६/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. उदय मुरलीधर कोळवणकर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १७/२/अ एकुण क्षेत्र ०.११.६० गुंठे तसेच सर्व्हे नं १७/२/क एकुण क्षेत्र ०.०९.१० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०८/०६/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती सुंदराबाई नाना लोभी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे मार्केवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३७/४/ब एकुण क्षेत्र ०.१६.८० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०८/०६/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

# कृषीवलने जपली 90 वर्षांची गौरवशाली परंपरा

## कृषीवलचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

**शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांचा आवाज बुलंद करण्याच्या उद्देशाने दिवंगत नारायण नागू पाटील यांनी सुरू केलेल्या कृषीवल वृत्तपत्राने यशस्वी ९० वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे. कृषीवल विविध उपक्रम आणि दर्जेदार पत्रकारितेच्या बळावर घराघरांत पोहोचले असून, आता ते शंभरीकडे वाटचाल करीत आहे. कृषीवलच्या इतिहासाचे दस्तावेजीकरण करण्यासाठी नागेश कुलकर्णी आणि शरद कोरडे यांनी पुढाकार घेऊन पुस्तक प्रकाशित करावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना कृषीवलला आणखी उंचीवर नेण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मत कृषीवलचे सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांनी व्यक्त केले.**

कृषीवलच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी (दि.७) अलिबागमधील वेश्वी येथील मॅपल आयव्ही हॉटेलच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कृषीवलचे सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांच्यासह कार्यकारी संपादक माधवी सावंत, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, कृषीवलच्या व्यवस्थापक हर्षा नाईक-पाटील, जाहिरात व्यवस्थापक सचिन गुप्ता, सहयोगी संपादक सुयोग आंग्रे, अर्थ विभाग प्रमुख दर्शना पाटील, पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार, उपसंपादक वैभव पाटील, डिजिटल उपसंपादक संतोष राऊळ, जिल्हा प्रतिनिधी प्रमोद जाधव, ज्येष्ठ साहित्यिक शरद कोरडे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश पाटील, प्रकाश म्हात्रे, वर्षा मेहता यांच्यासह जिल्ह्यातील प्रतिनिधी, छायाचित्रकार तसेच कृषीवलच्या संपादकीय, जाहिरात, वितरण, प्रशासकीय आणि मुद्रण विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहयोगी संपादक सुयोग आंग्रे आणि डिजिटल प्रमुख वर्षा मेहता यांनी केले.

यावेळी बोलताना कृषीवलचे सल्लागार संपादक प्रसाद केरकर म्हणाले की, कृषीवलमध्ये गेल्या १४ वर्षांपासून काम करण्याची संधी मिळाली. त्यापैकी आठ वर्षे संपादक आणि सहा वर्षे सल्लागार संपादक म्हणून कार्य करण्याचा आनंद लाभला. हे नाते आणि ही वाटचाल अशीच पुढे सुरू राहावी, अशी अपेक्षा आहे. कृषीवलच्या इंटरनेट आवृत्तीवर भर दिल्यानंतर वृत्तपत्राने डिजिटल विश्वातही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. इंटरनेट आवृत्तीत प्रसिद्ध झालेल्या एका बातमीमुळे एका तरुणाचे करिअर घडले, तर दुबईतील वाचकानेही त्या बातमीची दखल घेतली. ९० वर्षांची वाटचाल ही निश्चितच अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, कृषीवलची ९० वर्षांची वाटचाल ही केवळ एका वृत्तपत्राची कहाणी नसून विचार, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकीचा प्रवास आहे. संस्थापक स्व. नारायण नागू पाटील यांनी रोवलेल्या विचारांच्या पायावर स्व. प्रभाकर पाटील उर्फ भाऊ यांनी ही धुरा समर्थपणे सांभाळली. त्यानंतर माजी आमदार जयंत पाटील यांनी काळाची पावले ओळखत कृषीवलला नवे रूप, नवी दिशा आणि आधुनिकतेची जोड दिली. आज चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली कृषीवलने प्रिंट, डिजिटल आणि सोशल मीडिया अशा सर्वच क्षेत्रांत उल्लेखनीय झेप घेतली आहे. बदलत्या माध्यमविश्वातही सर्वसामान्यांचा आवाज म्हणून कृषीवलने आपली विश्वासार्हता कायम राखली असून, शंभरीकडे वाटचाल करताना ही परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेण्याची जबाबदारी आपणा सर्वांची असल्याचे त्यांनी सांगितले.





### शोधपत्रकारितेची गरज: माधवी सावंत



वर्धापन दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, संवाद साधण्याचा आणि ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्याचा सोहळा आहे. कृषीवलसोबत गेली १३ वर्षे नाते जोडले गेले असून, पत्रकार, उपसंपादक आणि कार्यकारी संपादक म्हणून एकाच वृत्तपत्रात काम करण्याची संधी मिळाली. पत्रकारितेचे स्वरूप बदलत असताना शोधपत्रकारिता अधिक आवश्यक बनली आहे. प्रत्येक वृत्तपत्राची स्वतःची धोरणे असतात. कृषीवलशी एक कौटुंबिक नाते निर्माण झाले आहे. आजही जुने कर्मचारी आणि पत्रकार आत्मीयतेने या सोहळ्यात सहभागी झाले आहेत, हीच कृषीवलची खरी ताकद असल्याचे कार्यकारी संपादक माधवी सावंत यांनी सांगितले.

### निर्भीड पत्रकारितेचा पाया 'कृषीवल': शैलेश पालकर



कृषीवलसोबत प्रतिनिधी म्हणून तब्बल ३९ वर्षांची वाटचाल राहिली आहे. ग्रामीण भागातील प्रश्न आणि वास्तव यांची ओळख कृषीवलच्या माध्यमातून झाली. १९८७ मध्ये प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. निर्भीड पत्रकारितेची मूल्ये कृषीवलने दिली असून, भविष्यात त्याची ताकद अधिक वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी केले.

### कृषीवलशी नाळ शेवटपर्यंत: महेश पवार



तरुण वयात कृषीवलमध्ये काम करण्याची संधी मिळाली. विविध विषयांवर लेखन आणि बातम्या करण्याची संधी या वृत्तपत्राने दिली. आज कृषीवलने ९० वर्षांचा टप्पा गाठल्याचा आनंद आहे. शंभरीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या या वृत्तपत्राशी जुळलेली नाळ आयुष्यभर कायम राहील, असे ज्येष्ठ पत्रकार महेश पवार यांनी सांगितले.

### कृषीवल सर्वसामान्यांचा आवाज: शरद कोरडे



आणीबाणीनंतर कृषीवलमध्ये बातमीदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली. छोट्या बातम्यांपासून पत्रकारितेची सुरुवात झाली. कृषीवलमधील लिखाणामुळे अनेक कलावंतांना शासकीय अनुदान मिळाले. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडत कृषीवल हे खऱ्या अर्थाने जनतेचे व्यासपीठ बनल्याचे ज्येष्ठ साहित्यिक शरद कोरडे यांनी सांगितले.

### कृषीवलच्या बातम्यांची दखल घ्यावीच लागते: संतोष पाटील



गेल्या काही वर्षांपासून कृषीवलमध्ये प्रतिनिधी म्हणून काम करत आहे. सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांच्या मार्गदर्शनामुळे ही संधी मिळाली. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे वृत्तपत्र क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी राहिली असली, तरी कृषीवलने ९० वर्षांची परंपरा यशस्वीपणे जपली आहे. कृषीवलमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचा विचार सर्वांनाच करावा लागतो. प्रशासन आणि शासनालाही दखल घ्यावी लागेल, अशा प्रभावी बातम्यांचा शोध घेणे आवश्यक असल्याचे ज्येष्ठ पत्रकार संतोष पाटील यांनी नमूद केले.

### वृत्तपत्राच्या वाटचालीचे साक्षीदार बनण्याचे भाग्य: नागेश कुलकर्णी



महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना कृषीवलमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्या काळात सुविधा मर्यादित होत्या. उरणमधील शेतकरी आंदोलनासारख्या विषयांना कृषीवलने न्याय दिला. शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांचा आवाज बनण्याचे कार्य या वृत्तपत्राने सातत्याने केले आहे. ९० वर्षांची परंपरा जपत शंभरीकडे वाटचाल करणाऱ्या या वृत्तपत्राच्या प्रवासाचे साक्षीदार बनण्याचे भाग्य लाभल्याची भावना रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी यांनी व्यक्त केली. खिळे जोडण्याच्या युगापासून आधुनिक तंत्रज्ञानापर्यंतचा प्रवास कृषीवलने अनुभवला असून, हा वारसा सक्षमपणे पुढे नेला जात असल्याचे नागेश कुलकर्णी म्हणाले.

### सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी झटणारे वृत्तपत्र: सुयोग आंग्रे



कृष्णधवल काळात सुरू झालेले कृषीवल आज सातासमुद्रापार पोहोचले आहे. सोशल मीडियाच्या प्रभावाच्या काळातही कृषीवलने स्वतःची स्वतंत्र ओळख कायम राखली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वृत्तपत्राची वाटचाल यशस्वीपणे सुरू असून, सर्वसामान्य, आरोग्य आणि सामाजिक प्रश्नांसाठी सातत्याने लढा दिला जात आहे. प्रतिनिधींनी त्यांच्या बातम्यांमधून ही परंपरा जपली आहे. प्रशासनावर वचक निर्माण करणारी पत्रकारिता ही कृषीवलची ओळख राहिल्याचे सहयोगी संपादक सुयोग आंग्रे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

### कृषीवलचा दबदबा कायम: प्रकाश म्हात्रे



कृषीवलचा वर्धापन दिन म्हणजे विश्वासार्ह आणि समाजाभिमुख पत्रकारितेचा उत्सव आहे. शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण भागातील प्रश्न प्रभावीपणे मांडत कृषीवलने वेगळी झेप घेतली आहे. वृत्तपत्रातील बातम्यांची दखल प्रशासन आणि शासनालाही घ्यावी लागते. जिल्ह्यापासून राज्य आणि देशभरात कृषीवलने आपला ठसा उमटवला असून, आगामी काळातही त्याचा दबदबा कायम राहील, असा विश्वास ज्येष्ठ पत्रकार प्रकाश म्हात्रे यांनी व्यक्त केला.











(छायाचित्र : गणेश पाटील/समीर मालोदे)











# झुरळांचे जंतरमंतर

कॉकरोच जनता पार्टीचे पहिले आंदोलन शनिवारी दिल्लीमध्ये पार पडले. मोदी सरकारने इतक्या सहजपणे हे आंदोलन होऊ दिल्यामुळे त्याच्याबाबत अनेकांनी शंका व्यक्त केल्या आहेत. सरकारची त्यांना आतून फूस आहे की काय असेही काहींना वाटते. पण आंदोलकांनी कालच्या सभेत अत्यंत स्पष्टपणे सरकारच्या धोरणांचा निषेध केला. हिंदू-मुस्लिम राजकारण बंद करण्यात यावे अशी मागणी केली. सर्वात महत्वाचे म्हणजे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सात दिवसात हा राजीनामा न आल्यास पुन्हा आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला. कालच्या आंदोलनावरच्या मिडियातल्या काही लोकांच्या प्रतिक्रिया पाहिल्या तर त्यांनी निराशा व्यक्त केली आहे. त्यांना बहुदा अण्णा हजारे व केजरीवाल यांच्या आंदोलनाप्रमाणे प्रचंड काहीतरी उभे राहील, कित्येक हजार लोक अनेक दिवस दिल्लीत ठिय्या देतील असे काहीतरी वाटत होते. पण मिडियाला अमुक वाटते म्हणून तशी आंदोलने उभी राहत नसतात. आंदोलक संघटनांची जमिनीवर ताकद किती आहे त्यांची संघटना कशी आहे यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. कॉकरोच जनता पार्टी हा मुळात एक सोशल मिडियामध्ये केला गेलेला विनोद होता. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीस सूर्यकांत यांनी या देशातील बेरोजगार तरुण हे झुरळांसारखे असतात अशी तुलना केली होती. या तरुणांना कुठेच काही नोकरी मिळाली नाही की ते पत्रकार किंवा माहिती अधिकार कार्यकर्ते म्हणून वावरू लागतात व व्यवस्थेला कुरतडतात असे बहुदा सरन्यायाधीशांना अभिप्रेत होते. नंतर त्यांनी आपल्या म्हणण्याचा विपर्यास केला गेला असा खुलासा केला तरी बूंद से गई वो हौद से आती नही. त्यांच्या त्या म्हणण्यावर अभिजित दीपके या मराठी तरुणाने होय आम्ही आहोत झुरळे अशी ललकारी दिली. त्यातूनच झुरळ जनता पार्टी जन्माला आली. सोशल मिडियातल्या अशा मीम्सना किंवा विनोदांना सध्याची तरुण पिढी इन्स्टाग्राम किंवा ट्विटरवर तात्काळ उचलून धरत असते. त्यानुसार दोन दिवसात दोन कोटी लोकांनी हे पेज फॉलो करण्यास सुरूवात केली. त्यामुळे जनतेत किती संताप आहे याचा प्रत्यय आला.

### ही तर केवळ सुरुवात आहे

हा संताप प्रत्यक्ष आंदोलनाच्या रुपाने उभी करण्याची संधी नीट परिक्षेच्या पेपरफुटीमुळे मिळाली. पाठोपाठ सीबीएसईमधील पेपर तपासणी घोटाळा समोर आला. या प्रकरणात सीबीएसईच्या अध्यक्षांना घालवावे लागले. नीट परीक्षा रद्द झाल्याचा आणि सीबीएसईच्या चुकीच्या गुण देण्याचा लाखो विद्यार्थ्यांना फटका बसला. त्यातून मग कालचे आंदोलन आकाराला आले. हे सर्व करताना अभिजित दीपके हा अमेरिकेत होता. तो पूर्वी आम आदमी पक्षात असला तरी त्याचा चेहरा कोणालाही परिचित नव्हता. मधल्या काळात त्याने मिडियामध्ये ज्या मुलाखती दिल्या आहेत त्यावरून त्याची राजकीय भूमिका फार स्पष्ट झालेली नाही. किंबहुना आपण नोकरी करण्याचा विचार करीत होतो, तेव्हा अचानक ही जबाबदारी आपल्यावर येऊन पडल्याचे त्याने पुन्हा पुन्हा म्हटले आहे. अशा स्थितीत त्याच्याकडून एकाएकी चळवळीला नेतृत्व किंवा दिशा देण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे. अण्णा हजारे हे २०११ पूर्वी किमान तीस वर्षे अनेक आंदोलने करीत होते. केजरीवाल हे दिल्लीमध्ये किमान दहा वर्षे जनचळवळी उभारत होते. दीपके किंवा त्याच्या आजूबाजूच्यांकडे असा कोणताही पूर्वानुभव नाही. परीक्षांमधील भानगडींच्या निमित्ताने एकत्र आलेली ही तरुण पिढी आहे. काल त्यांचा पहिला इव्हेंट झाला. आता इथून पुढे एकत्र आल्यावर त्यांचे विचार अधिक स्पष्ट होतील. दीपके व चारदोन जण वगळले तर बाकी काल जंतरमंतरवर आलेले बहुसंख्य जण साधे तरुण होते. त्यांचा राजकारण, चळवळी इत्यादींशी काही संबंध नाही. यातले अनेक जण व त्यांचे पालकही निवडणुकीमध्ये कदाचित मोदींना व भाजपला मतदान करीत असतील. पण परिक्षांच्या निमित्ताने निर्माण झालेला त्यांचा संताप खरा आहे. मुख्य म्हणजे त्या निमित्ताने का होईना पण ते खुलेपणाने व सोशल मिडियामध्ये मोदी सरकारवर टीका करीत आहेत. शिक्षण खाते किंवा सीबीएसईसारख्या संस्थांची तर अक्षरशः सालटी काढत आहेत. हा सगळा संपन्न असा मध्यमवर्ग आहे. हा एरवी भाजपचा समर्थक वर्ग आहे. म्हणूनच त्यातून निर्माण झालेले हे बंड महत्वाचे आहे.

### जागवली नवी आशा

पंजाबातल्या शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्द तब्बल दीड वर्ष दिल्लीत ठाण मांडले. पण मोदींनी त्यांना दुर्लक्ष करून मारण्याचा प्रयत्न केला. मिडियाने त्यांना खलिस्तानी ठरवले. पोलिसांनी त्यांच्या रस्त्यात खिळे ठोकले. अखेरीला शेतकरी जिंकले. पण राजकीयदृष्ट्या तेही भाजपला मोठा विरोध उभा करू शकले नाहीत. हरियाणामध्ये पुन्हा भाजपचेच सरकार आले. त्यामुळे कॉकरोच जनता पार्टीकडून अवास्तव अपेक्षा करणे चुकीचे आहे. लोकांना या सरकारविरुदध प्रचंड संताप आला व तो त्यांनी व्यक्त केला हे महत्वाचे आहे. मोदी सरकार नालायक आहे हे असंख्य लोक रस्त्यावर येऊन बोलले हे महत्वाचे आहे. मोदींचे तळवे चाटणारा मिडिया जनतेतील संताप दडवू व दडपू शकला नाही हे महत्वाचे आहे. या संतापाला आकार देणे व त्यातून राजकीय विरोध उभा करणे हे काँग्रेससारख्या पक्षांचे काम आहे. दीपके व त्याच्या सहकाऱ्यांकडून काही अपेक्षा जरूर करता येतील. त्यांनी जनतेच्या या उद्रेकाशी, बंडखोरीच्या भावनेशी गद्दारी करू नये, सरकारसोबत तडजोड करू नये असे सर्वांनाच वाटत असेल. कारण, उद्या समजा आंदोलकांपैकी काही जण सरकारचेच एजंट निघाले किंवा त्यांनी समजा सरकारशी मांडवली केली तर लोकांना प्रचंड विश्वासघात झाल्यासारखे वाटते. प्रामाणिक कार्यकर्त्यांवर तो मोठा आघात ठरतो. त्यांच्याकडेही सामान्य माणसे संशयाने पाहू लागतात. त्यांच्यामागे उभे राहण्यास कचरतात. दीपके यांनी काल एका दिवसात आंदोलन संपवले हे ठीक झाले. खुद्द दीपके कालच सकाळी अमेरिकेहून आलेले असल्याने त्यांना आपल्या सहकाऱ्यांशी विचारविमर्श करण्यास अवसर मिळायला हवा. शिवाय प्रधानांनी राजीनामा दिल्याशिवाय मागे हटणार नाही असे म्हणण्याइतकी ताकद अजून त्यांच्यासोबत उभी राहिलेली नाही. ती ताकद कमावण्याची इच्छाशक्ती व मुत्सदेगिरी ते दाखवतात का याचे उत्तर भविष्यात मिळेल. पण जोवर त्यांच्या अप्रमाणिकपणाचा थेट पुरावा मिळत नाही तोवर त्यांच्या चळवळीबाबत सतत शंका घेत राहता कामा नये. विरोधकांनीही दीपके यांना आपले प्रतिस्पर्धी म्हणून न पाहता या चळवळीचा आपल्या भावी राजकारणासाठी कसा योग्य रीतीने उपयोग करून घेता येईल या दृष्टीनेच पाहायला हवे. तूर्तास दीपके आणि मंडळी केवळ परिक्षांवर बोलत आहेत. आज ना उद्या त्यांना देशातील एकूण शैक्षणिक व्यवस्थेवर बोलावे लागेल. नंतर त्यांना एकूण अदानीच्या दावणीला बांधलेल्या एकूण अर्थव्यवस्थेविरुध्द आणि मोदी सरकारच्या देशात खड्ड्यात घालणाऱ्या धोरणांविरुध्दही बोलावे लागेल. तसे ते बोलले नाहीत तर निराशा होईल. पण म्हणून कालचा जंतरमंतरवरचा त्यांच्या आंदोलनाचे मोल कमी होणार नाही. कालच्या प्रसंगातून या युवकांनी पुन्हा एकवार नवी आशा जागवली आहे.

## विचार

# घट आणि वट

**इंधन दरवाढीमुळे धास्तावलेल्या अर्थजगताला गेल्या आठवड्यातही दिलासा मिळाला नाही. गेल्या काही काळात देशात सोनेखरेदीमध्ये काहीशी घट अनुभवायला मिळाली आहे. अशीच घट विमान प्रवाशांच्या संख्येतही अनुभवायला मिळाली आहे. त्याच सुमारास भारत हे स्मार्टफोन उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्याची योजना समोर आली. दरम्यान, बनावट नोटांच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याचे अर्थनगरीमध्ये पहायला मिळाले.**



**महेश देशपांडे**

सरकारने नानाविध बंधने घातल्यानंतर देशात सोनेखरेदीमध्ये काहीशी घट अनुभवायला मिळाली आहे. अशीच घट विमान प्रवाशांच्या संख्येतही अनुभवायला मिळाली आहे. त्याच सुमारास भारत हे स्मार्टफोन उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्याची योजना समोर आली. दरम्यान, बनावट नोटांच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याचे अर्थनगरीमध्ये पहायला मिळाले.

देशात सध्या लग्नसराई आणि सणासुदीचा काळ असूनही सुवर्ण बाजारपेठेत शांतता पहायला मिळत आहे. नवीन सोन्याची खरेदी जवळपास ७० टक्क्यांनी कमी झाली आहे; मात्र दुसरीकडे ग्राहकांनी एक सुवर्णमध्य काढत घरातील जुने सोने मोडून नवीन दागिने बनवण्याकडे कल वळवला असल्याचे चित्र बाजारपेठेत आहे. भारतात दर वर्षी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सोन्याच्या खरेदीमुळे आणि आयातीमुळे देशातील मौल्यवान परकीय चलन मोठ्या प्रमाणात परदेशात खर्ची पडत होते. याचा थेट विपरीत परिणाम देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेवर आणि रुपयाच्या मूल्यावर होत आहे. हीच बाब लक्षात घेऊन मोदी यांनी जनतेला एक वर्ष सोने खरेदी न करण्याचे भावनिक आवाहन केले होते. यासोबतच सोन्यावरील आयात शुल्कही वाढवले. पंतप्रधानांचे आवाहन आणि आयात शुल्कातील वाढ या दोन्हीचा एकत्रित परिणाम सुवर्ण व्यवसायावर मोठ्या प्रमाणावर झाला आहे. एरवी रोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या आणि ग्राहकांनी गजबजणाऱ्या सराफा बाजारात आता शुकशुकाट पहायला मिळत आहे. सराफा व्यापाऱ्यांच्या मते नव्याने शुद्ध सोने खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या अचानक ५० ते ७० टक्क्यांनी खाली आली आहे. नवीन सोन्याला मागणी नसल्याने व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असले, तरी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी नागरिक या आवाहनाचे पालन करत आहेत.

बाजारपेठेत एकीकडे नवीन सोन्याची खरेदी ठप्प झाली असली, तरी दुसरीकडे अनेक ग्राहकांनी कौटुंबिक सुवर्णखरेदी पूर्ण करण्यासाठी एक नवा मार्ग शोधला आहे. लग्नकार्यासाठी लागणारे दागिने खरेदी करण्यासाठी ग्राहक आता घरातील जुनेच दागिने सराफा दुकानात आणून देत आहेत. काही ग्राहकांनी सांगितले, की घरात शुभ कार्य असल्याने सोन्याचे दागिने अत्यंत आवश्यक आहेत. म्हणूनच आम्ही नव्याने कोणतेही सोने न घेता, घरातील जुने सोने मोडून त्यातूनच नवीन डिझाईनचे दागिने बनवून घेत आहोत. यामुळे गरजही पूर्ण होत आहे आणि देशाचे परकीय चलनही वाचत आहे, अशी प्रतिक्रिया ग्राहकांनी दिली.

अशीच घट भारतातील देशांतर्गत हवाई वाहतूक क्षेत्रात एप्रिल महिन्यात प्रवासी संख्येत नोंदवण्यात आली. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार एप्रिल २०२६ मध्ये देशांतर्गत विमान कंपन्यांनी सुमारे १.३८ कोटी प्रवाशांना सेवा दिली. मार्च महिन्यात हा आकडा १.४४ कोटी होता. त्यामुळे महिन्यागणिक आधारावर प्रवासी वाहतुकीत ४.२ टक्क्यांची घट झाली आहे. तसेच एप्रिल २०२५ मधील १.४३ कोटी प्रवाशांच्या तुलनेतही यंदाची संख्या ३.४७ टक्क्यांनी कमी आहे. 'डीजीसीए'च्या माहितीनुसार, जानेवारी ते एप्रिल २०२६ या कालावधीत देशांतर्गत विमान कंपन्यांनी एकूण ५७५.४९ लाख प्रवाशांना सेवा दिली. हा आकडा मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत केवळ ०.०६ टक्क्यांनी जास्त आहे. त्यामुळे विमान वाहतूक क्षेत्रातील वाढीचा वेग मंदावल्याचे दिसून येत आहे. प्रवासी मागणीत घट, विमान इंधनाच्या वाढत्या किमती आणि संचालन व्यवस्थापनासाठी विमान कंपन्यांनी केलेले नेटवर्कमधील बदल यांसारख्या कारणांमुळे हा मंदावलेला कल दिसत असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, भारत सरकार मोबाइल उत्पादन क्षेत्रात पुढचा टप्पा गाठण्याच्या तयारीत आहे. आतापर्यंत भारतात मोठ्या प्रमाणावर स्मार्टफोनची असेंब्ली आणि निर्यात वाढली असली, तरी अनेक महत्त्वाचे इलेक्ट्रॉनिक घटक अजूनही परदेशातून आयात करावे लागतात. हीच परिस्थिती बदलण्यासाठी सरकार पीएलआय २.० (प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेन्टिव्ह) योजना आणण्याच्या तयारीत आहे. या नव्या योजनेचे मुख्य उद्दिष्ट मोबाइल फोनमध्ये वापरल्या जाणाऱ्या किमान ५५ टक्के घटकांचे उत्पादन भारतातच करणे हे आहे. सध्या हा आकडा केवळ १८ ते २० टक्क्यांच्या आसपास आहे. त्यामुळे परदेशी आयातीवरील अवलंबित्व कमी करून भारताला इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. नवी योजना ४० हजार कोटी रुपयांच्या 'इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पोनंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीम'शी जोडली जाणार आहे. या माध्यमातून डिस्प्ले, कॅमेरा मॉड्यूल, चिपसेट, लिथियम-आयर्न बॅटरी आणि इतर महत्त्वाच्या इलेक्ट्रॉनिक घटकांच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना दिली जाणार आहे. भारत स्मार्टफोन उत्पादन आणि निर्यातीमध्ये मोठी झेप घेत असला, तरी उच्च मूल्याचे अनेक महत्त्वाचे घटक अजूनही आयात करावे लागतात. त्यामुळे उत्पादन वाढूनही आयातीवरील खर्च मोठ्या प्रमाणात कायम राहतो. यामुळे नव्या 'पीएलआय २.०' योजनेत केवळ विक्री आणि उत्पादनवाढीवर भर न देता स्थानिक स्रोतांमधून खरेदी आणि देशांतर्गत उत्पादनाला अधिक प्रोत्साहन दिले जाणार आहे. भारतातच मोबाइलचे महत्त्वाचे भाग तयार करणाऱ्या किंवा स्थानिक पातळीवर खरेदी करणाऱ्या कंपन्यांना अतिरिक्त लाभ देण्याची शक्यता आहे.

२०२० मध्ये सुरू झालेल्या 'पीएलआय' योजनेला चांगले यश मिळाले आहे. या योजनेअंतर्गत ३२ कंपन्यांनी गुंतवणूक, उत्पादन आणि निर्यातीची उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. आतापर्यंत १७ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ११.०१ लाख कोटी रुपयांचे उत्पादन आणि ६.२७ लाख कोटी रुपयांची निर्यात करण्यात आली आहे. सरकारची अपेक्षा आहे, की 'इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पोनंट मॅन्युफॅक्चरिंग स्कीम'अंतर्गत मंजूर झालेल्या ७५ कारखान्यांपैकी अनेक कारखाने या वर्षी उत्पादन सुरू करतील. त्यामुळे भारतात मोबाइलचे सुटे भाग आणि महत्त्वाचे इलेक्ट्रॉनिक घटक तयार करण्याचा वेग आणखी वाढेल. 'पीएलआय २.०' ही योजना भारताला केवळ मोबाइल असेंब्ली करणारा देश न ठेवता मोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील महत्त्वाचे घटक तयार करणारे जागतिक उत्पादन केंद्र बनवण्याच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल मानले जात आहे. यामुळे रोजगारनिर्मिती वाढेल, आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि भारताची इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील स्पर्धात्मकता अधिक मजबूत होईल.

आता आणखी एक महत्वाची अर्थवार्ता. देशात बनावट नोटांच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असतानाच दोन हजार रुपयांच्या बनावट नोटांच्या संख्येत मात्र मोठी घट झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार बाजारात सध्या ५०० रुपयांच्या खोट्या नोटा मोठ्या प्रमाणात फिरत आहेत. त्यामुळे नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी रोख व्यवहार करताना विशेष काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. भारतीय बँकिंग व्यवस्थेत बनावट नोटांचा धोका वाढत असल्याचे दिसत आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या वार्षिक अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकांनी एकूण दोन लाख २९ हजार ७४६ बनावट नोटा ओळखल्या. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्या ५.७ टक्के जास्त आहेत. सर्वात मोठी चिंता ५०० रुपयांच्या नोटांची आहे. देशात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या या नोटेच्या बनावट आवृत्त्यांची संख्या २०.५ टक्क्यांनी वाढून एक लाख ४१ हजार ९०७ वर पोहोचली आहे. या रिपोर्टमध्ये असे दिसून आले आहे, की बनावट नोटांच्या एकूण प्रकरणांमध्ये ५०० रुपयांच्या नोटांचा वाटा आता सर्वाधिक आहे, तर २,००० रुपयांच्या बनावट नोटांच्या संख्येत मोठी घट झाली आहे.

५०० रुपयांची नोट आता बनावट नोटा बनवणाऱ्यांचे सर्वात मोठे लक्ष्य बनली आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँकिंग व्यवस्थेत पकडण्यात आलेल्या एकूण बनावट नोटांपैकी ६१.८ टक्के हिस्सा या नोटांचा होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये हा आकडा ५४.२ टक्के आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३८.५ टक्के होता. हा सतत वाढणारा हिस्सा हा एक संकेत आहे, की फसवणूक करणारे आता उच्च-मूल्य आणि उच्च मूल्याच्या नोटांवर अधिक लक्ष केंद्रित करीत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या 'उत्कर्ष २०२९' कार्यक्रमांतर्गत नोटांची सुरक्षा वाढवण्याची आणि अधिक टिकाऊ बनवण्याची योजना आहे. बनावट नोटांना आळा घालणे आणि लोकांचा चलनावरील विश्वास मजबूत ठेवणे हा त्याचा उद्देश आहे. सध्या देशात ५०० रुपयांच्या ७०५.४८ कोटी नोटा चलनात आहेत. यामुळेच बनावट नोटा तयार करणारे या नोटांना सर्वाधिक लक्ष्य करत आहेत. चलनात असलेल्या इतक्या मोठ्या संख्येमुळे बनावट नोटा बनवण्याच्या तंत्रात थोडीशी सुधारणा झाली तरी मोठ्या प्रमाणात बनावट नोटा सापडू शकतात.

## चर्चा आजची

# वाढीव डिझेल दराचा मच्छीमारांवर भार

**वैष्णवी वाडकर**



कोकणातील मासे म्हणजे सर्वांच्या आवडीचा विषय. जगाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक खास रायगडसह कोकण परिसरात ताज्या मच्छीचा आस्वाद घेण्यासाठी येत असतात. मात्र, आता हीच मच्छी सर्वसामान्यांच्या ताटातून हद्दपार होण्याची भीती निर्माण झाली आहे. सध्या मत्स्य व्यवसाय आर्थिक संकटात सापडला असून, युद्धजन्य परिस्थितीमुळे मार्च महिन्यापासून डिझेलच्या दरात झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे वाढीव दराने डिझेल खरेदी करणे परवडत नसल्याने अनेक मच्छिमारांनी मासेमारीच्या फेऱ्या कमी केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे वाढीव डिझेल दराचा मच्छिमारांवर मोठा आर्थिक भार पडत असल्याची चर्चा जनसामान्यांत आहे.

समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या बोटींचा संपूर्ण कारभार डिझेलवर अवलंबून असतो. त्यामुळे वाढलेल्या इंधन दरामुळे मासेमारीचे आर्थिक गणित कोलमडले आहे. रायगड जिल्ह्यातील ४० मच्छिमार सहकारी संस्थांमार्फत सुमारे १ हजार ९६१ मासेमारी नौकांना डिझेलचा पुरवठा केला जातो. वर्षाकाठी जवळपास ४७ हजार ८४० किलो लिटर डिझेलचा कोटा मंजूर असला तरी वाढीव दरामुळे या व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बोटीला एका फेरीसाठी सुमारे २ ते ३ हजार लिटर डिझेल लागते. म्हणजेच दररोज मासेमारीसाठी लागणाऱ्या बोटींसाठी शेकडो लिटर डिझेलची आवश्यकता असते. डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असल्यामुळे प्रत्येक फेरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पूर्वी ज्या खर्चात दोन ते तीन दिवस मासेमारी करता येत होती त्याच खर्चासाठी आता अधिक पैसे मोजावे लागत आहेत. त्यामुळे अनेक मच्छिमारांनी समुद्रात जाण्याचे दिवस कमी केल्याचे सांगितले जात आहे. मासेमारीतून मिळणारे उत्पन्न आणि त्यासाठी होणारा खर्च यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. इंधनासह बर्फ, जाळी, बोटींची दुरुस्ती, कामगारांचे मानधन आणि वाहतूक खर्चातही वाढ झाल्याने मच्छिमारांचे आर्थिक ओझे वाढले आहे. अनेक मच्छिमारांनी बँका तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेतले असून, वाढत्या खर्चामुळे कर्जफेड करणेही कठीण बनले आहे, असे सांगण्यात येत आहे.

मत्स्य व्यवसाय हा कृषी क्षेत्राचा भाग मानला जात असला तरी मच्छिमार सहकारी संस्थांना अद्यापही घाऊक ग्राहक म्हणजेच बल्क श्रेणीतच ठेवण्यात आले आहे. त्यामुळे खासगी पेट्रोल पंपांवर उपलब्ध असलेल्या दराच्या तुलनेत सहकारी संस्थांना अधिक दराने डिझेल खरेदी करावे लागत आहे. सध्या ऑईल कंपन्यांकडून सुमारे १५३ रुपये (अंदाजे) प्रतिलिटर दराने डिझेल उपलब्ध होत असून, खासगी पंपांवर हा दर ९२ ते ९४ रुपये प्रतिलिटरच्या आसपास आहे. त्यामुळे प्रत्येक लिटरमागे ५० ते ६० रुपयांचा अतिरिक्त भार सहन करण्याची वेळ मच्छिमार सहकारी संस्थांवर आली आहे. दरम्यान, डिझेलच्या वाढलेल्या दराचा परिणाम केवळ मासेमारीपुरता मर्यादित राहिलेला नाही. मासळीची वाहतूक, बर्फनिर्मिती उद्योग, प्रक्रिया उद्योग तसेच बाजारपेठांवरही त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. मासेमारी कमी झाल्यास बाजारात मासळीचा पुरवठा घटण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम ग्राहकांनाही भोगावा लागू शकतो. भविष्यात मासळीच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता मत्स्य व्यवसायाशी संबंधित घटकांकडून व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे वाढत्या डिझेल दरांचा परिणाम रायगडसह कोकणातील पर्यटन व्यवसायावरही होण्याची शक्यता आहे. इंधन खर्चात वाढ झाल्यास मासळीचे दर आणखी वाढू शकतात. याचा परिणामी हॉटेल व्यावसायिकांसह सर्वसामान्य ग्राहकांवर देखील होऊ शकतो. त्यांना मासळी खरेदी करणे परवडणार नाही. कोकणातील समुद्री खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक या भागात येत असतात. मात्र, वाढत्या किंमतीमुळे पर्यटकांच्या खर्चावर परिणाम होऊन पर्यटनाच्या ओघावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आधीच वारंवार येणारी वादळे, अवकाळी पाऊस, बदलते हवामान आणि समुद्रातील बदलत्या परिस्थितीमुळे मच्छिमार अडचणीत आले आहेत. अशा परिस्थितीत डिझेल दरवाढीमुळे त्यांच्यासमोरील संकट आणखी गंभीर बनले आहे. कोकण किनारपट्टीवरील हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह मत्स्य व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे वाढत्या इंधन दरांचा प्रश्न केवळ मच्छिमारांपुरता मर्यादित नसून, संपूर्ण मत्स्य व्यवसायाच्या भवितव्याशी निगडित बनला आहे. मासेमारीतून देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देण्यात या क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. मात्र, वाढत्या खर्चामुळे या पारंपरिक व्यवसायासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यामुळे वाढत्या डिझेल दरांचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा आगामी काळात मत्स्य व्यवसायावर त्याचे गंभीर परिणाम होण्याची भीती जनसामान्यांतुन व्यक्त केली जात आहे.

## लोकसंसद

### पाकिस्तानी वस्तू महाराष्ट्रात येतातच कशा ?

पिंपरी चिंचवड येथील श्री मोरया गोसावी मंदिर परिसरातील यात्रेत 'मेड इन पाकिस्तान' वस्तूंच्या विक्रीचा दावा करणारा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. या मंदिर परिसरात संकष्टी चतुर्थीनिमित्त भरलेल्या यात्रेत एका महिलेने खरेदी केलेल्या चादरीवर 'मेड इन पाकिस्तान' असे लेबल आढळल्याचे महिलेने म्हटले आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्रातील संभाजीनगर जिल्ह्यात 'मेड इन पाकिस्तान' लेबल असलेली सौंदर्यप्रसाधने विकणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली होती. यामुळे स्थानिक बाजारात परदेशी वस्तूंच्या विक्रीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही चादर नेमकी कुठून आली ? ती अधिकृतपणे आयात झाली होती कि नाही, तसेच विक्रेत्याची बाजू काय आहे? याविषयी अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नसून पोलिसांनी एक विशेष पथक स्थापन केले आहे. ही चादर कुठून आली आणि जत्रेत ती कुणी विकली? याचा शोध घेतला जात आहे. पोलिसांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेला पत्र लिहून अशा दुकानदारांवर कारवाई करण्यास सांगितले आहे. पाकिस्तानी सीमेपासून हजारो किलोमीटर दूर असलेल्या देवस्थानांच्या ठिकाणी शत्रूराष्ट्रात तयार केलेल्या वस्तूंची अशी खुलेआम विक्री केली जात असेल तर देवस्थानांच्या तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारतातील तीर्थक्षेत्रे, मंदिरे ही पाकिस्तानच्या तसेच आतंकवाद्यांच्या नेहमीच रडारवर असतात अशा परिस्थितीत पाकिस्तानात तयार करण्यात आलेली उत्पादने महाराष्ट्रातील देवस्थानांच्या ठिकाणी बसणाऱ्या विक्रेत्यांपर्यंत पोहोचतातच कशी? पाकिस्तानातून आलेल्या चादर आणि सौंदर्य प्रसाधने नागरिकांच्या सतर्कतेमुळे निदर्शनास आली आहेत.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## दिनविशेष

# जागतिक महासागर दिन

८ जून हा जागतिक महासागर दिन म्हणून साजरा केला जातो. संपूर्ण जगभरात या दिवसाला विशेष महत्व आहे. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस ८ जूनपासून अधिकृतरीत्या साजरा करण्यास सुरुवात केली. समुद्र दूषित होण्याचे प्रमाण वाढल्याने त्यासंबंधी जनजागृती करणे आवश्यक बनले आहे. या संदर्भातला प्रस्ताव १९९२ मध्येच कॅनडाने ब्राझीलमध्ये झालेल्या वसुंधरा शिखर परिषदेत मांडला. त्याला संयुक्त राष्ट्रसंघाने २००८ मध्ये मान्यता दिली. तेव्हापासून ङ्गद ओशन प्रोजेक्टफ या अमेरिकन संस्थेच्या सहकार्याने जागतिक महासागर दिन आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो.

जगभरातील महासागरांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वर्षातून एकदा साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे असा हा दिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्वाचे आहे. यानिमित्ताने व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर महासागर रक्षणाची संधी घेतली जाते. दरवर्षी एखादा ध्येय ठेऊन हा दिवस साजरा केला जातो. ङ्गद ओशन प्रोजेक्टफ या १९९७ साली अमेरिकेत स्थापन झालेल्या (आणि आता जागतिक झालेल्या) प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, संग्रहालये यांच्या संघटनेने ङ्गएकच महासागरफ ही संकल्पना मांडली. परंतु भौगोलिकदृष्ट्या आणि राजकीयदृष्ट्याही या ङ्गएकच महासागराफ्ची पाच खंडांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे समुद्र हा खाद्य आणि विपुल प्रमाणात ऑक्सिजन पुरविणारा स्रोत, जैवविविधतेचे महाकाय भांडार, अनेकविध रत्ने, खनिजे, तेल आपल्या उदरात बाळगणारा रत्नाकर. ही सर्व वर्णने अपुरी पडतील, अशा अगणित मार्गांनी महासागर मानवासाठी व एकूणातच चराचर सृष्टीसाठी महत्वपूर्ण आहे. जागतिक महासागर दिनानिमित्ताने संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश, त्यांतील सागरी परिसंस्थेशी संबंधित संस्था, अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधक-अभ्यासक मिळून समुद्राविषयीचे विविध पैलू जगासमोर आणण्याचा प्रयत्न करतात. जगाचा ९७% भाग समृद्ध, दोलायमान निळ्या रंगाच्या पाण्याने व्यापलेला आहे, या पाण्यात पृथ्वीवरील अनेक जीवसृष्टी राहत आहेत, आणि त्यात प्रचंड प्रमाणात खनिजे असेच ओईल हेही आपणास मिळते. हे ब्लँकेट जगातील महासागर आहे आणि ते जगातील सर्वात लोकप्रिय सुट्टीतील ठिकाणांपैकी एक म्हणून काम करतात आणि जगभरातील देशांच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. समुद्राच्या खोली ओलांडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात मालवाहतूक होते आणि तरीही ते व्यापारासाठी मुख्य मार्ग म्हणून काम करते. जागतिक महासागर दिन हा महासागर आणि आपल्या जीवनात त्याची महत्त्वाची भूमिका साजरा करतो. महासागरांच्या समर्थकांसाठी चर्चा करण्याची ही वेळ आहे जेणेकरून ते स्वच्छ पाणी आणि वापरण्यायोग्य राहू शकतील. महासागांचा जलचक्रामध्ये खूप मोठा सहभाग आहे महासागरातील पाण्याचे वाफ होऊनच आपल्याला पाऊस स्वरुपात हे पाणी पिण्यासाठी वापरता येते. कोणत्याही विनाशाची किंवा मानवनिर्मित अडथळ्यांची चिंता न करता प्राणी फिरण्यासाठी आणि राहण्यासाठी आनंदी आणि सुरक्षित ठिकाणास पात्र आहेत. सर्वांसाठी निरोगी घर सुनिश्चित करण्यात मदत करण्यासाठी महासागरांचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. महासागरावर अभूतपूर्व धोका आहे. प्रदूषण, अतिमासेमारी, अधिवासाचा विनाश आणि हवामान बदल सागरी परिसंस्थांना विनाशाच्या उंबरठ्यावर ढकलत आहेत. प्लास्टिकचा कचरा सागरी जीवांचा जीव गुदमरवत आहे, वाढत्या तापमानामुळे प्रवाळ खडक पांढरे पडत आहेत आणि अतिशोषणामुळे माशांचा साठा कमी होत आहे. किनारपट्टीवरील समुदाय, आदिवासी लोक आणि लहान बेट विकसनशील राष्ट्रे आधीच महासागराचा ऱ्हास आणि वाढत्या समुद्र पातळीच्या विनाशकारी परिणामांना तोंड देत आहेत. दरवर्षी ८ जून रोजी साजरा होणारा जागतिक महासागर दिन, महासागराचे संरक्षण आणि पुनर्संचयन करण्याच्या आपल्या सामायिक जबाबदारीची जागतिक स्तरावर आठवण करून देतो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

८ जून

१)श्री. अशोक महादेव मलुष्टे धोकवडे, अलिबाग, ८-६-१९३९

२) श्री. सुरेश गणपत पाटील अलिबाग, ८-६-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दुर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

# देहरंग धरणाची उंची वाढवणार

## • पाणीप्रश्न मार्गी लागणार; पनवेल महापालिका प्रशासनाचा अंदाज

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहराची पाण्याची गरज लक्षात घेऊन देहरंग धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धरणाची उंची सध्याच्या पातळीपेक्षा २० मीटरने वाढविल्यास पाणी साठवण क्षमतेत मोठी वाढ होऊन शहराचा दीर्घकालीन पाणीप्रश्न मार्गी लागू शकतो, असा अंदाज पनवेल महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी गाव, वाड्यांतील नागरिकांचे पुनर्वसन आणि १,२०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे.




महापालिकेच्या पाणीपुरवठा व बांधकाम विभागाने यासंदर्भात प्राथमिक आराखडा तयार केला आहे. प्रस्तावित विस्तारानुसार मुख्य बंधाऱ्याची उंची २० मीटरने वाढविण्यात येणार असून त्यामुळे धरणातून सध्या उपलब्ध असलेल्या पाणीपुरवठ्याच्या तुलनेत जवळपास दहापट अधिक, म्हणजेच प्रतिदिन १३१ एमएलडी पाणी उपलब्ध होऊ शकते. धरण विस्तारासाठी अंदाजे १,००० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून धरणातील पाणी शहरापर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी योजनेसाठी आणखी २०० कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे. सध्या देहरंग धरणाचे क्षेत्रफळ १५ हेक्टर असून त्याची साठवण क्षमता ३.५७ दशलक्ष घनमीटर आहे. विस्तारानंतर ही क्षमता ३७.८१ दशलक्ष घनमीटरपर्यंत वाढू शकते. त्यासाठी अतिरिक्त २१४ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. प्रस्तावित विस्तारित जलक्षेत्रामुळे टावरेवाडी, मालढुंगे तसेच परिसरातील काही आदिवासी वाड्या आणि शेतघरे प्रभावित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुनर्वसन हा प्रकल्पातील महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

माथेरान डोंगररांगालगत असलेल्या या परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असल्याने धरण विस्ताराची संकल्पना व्यवहार्य मानली जात आहे. या प्रकल्पासाठी नागरी आव्हान निधी तसेच जागतिक बँकेच्या आर्थिक साहाय्याचा पर्यायही विचाराधीन आहे. धरण विस्ताराचा प्राथमिक प्रस्ताव पनवेल महापालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेत (महासभा) सादर केला जाणार आहे. मंजूर ठराव राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर निधी मिळविण्याच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेची विधानपरिषद निवडणूकीची आचारसंहिता सुरू असल्याने जून अखेरीस ही महासभा होण्याची चिन्हे आहेत.

मुख्यमंत्र्यांनी पनवेल शहराचा वाढता विस्तार आणि सद्यस्थितीतील पाण्याचा तुटवडा लक्षात घेऊन देहरंग धरणाची उंची वाढविणे आणि विस्तारित धरण प्रकल्पाला तातडीने मंजुरी देणे आवश्यक आहे. हा प्रकल्प मुख्यमंत्री वॉर रूमच्या देखरेखीखाली घेतल्यास धरण विस्ताराच्या कामाला खऱ्या अर्थाने गती मिळू शकेल आणि पुढील तीन वर्षांत या धरणातून प्रत्यक्ष पाणी पनवेलकरांना उपलब्ध होऊ शकेल.

## कोस्टल रोडवर भरदिवसा पथदिवे सुरू

**| उरण | प्रतिनिधी |**

एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना वीज बचतीचे धडे देणारे प्रशासन स्वतः मात्र किती बेजबाबदारपणे वागते, याचा प्रत्यय उरण येथील सिडकोच्या कोस्टल रोडवर पाहायला मिळत आहे. या कोस्टल रोडवर मागील कित्येक दिवसांपासून दिवसाढवळ्या पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) सुरू असल्याचे चित्र असून, यामुळे दररोज हजारो युनिट विजेची नाहक उधळपट्टी होत आहे.



उरण येथील सिडकोच्या अखत्यारित येणाऱ्या या प्रमुख कोस्टल रोडवर मागील काही दिवसांपासून हे विजेचे दिवे चोवीस तास म्हणजेच रात्रंदिवस सुरू आहेत. विशेष म्हणजे, सिडकोच्याच काही अंतर्गत रस्त्यांवर रात्रीच्या वेळी घोर अंधार असतो, ज्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अशा स्थितीत, जिथे गरज आहे तिथे अंधार आणि जिथे गरज नाही अशा कोस्टल रोडवर थेट भरदिवसा कडक उन्हातही पथदिवे लखलखत असतात.

या मार्गावरून दररोज हजारो वाहने, कंटेनर आणि नागरिक ये-जा करत असतात. भरदिवसा सुरू असणाऱ्या या दिव्यांकडे सिडकोच्या विद्युत विभागाचे साफ दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. ही विजेची उधळपट्टी म्हणजेच जनतेच्या पैशांचा अपव्यय आहे, अशी टीका स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. सिडको प्रशासनाने या गंभीर प्रकाराची त्वरित दखल घेऊन दिवसा सुरू राहणारे पथदिवे बंद करावेत आणि रात्रीच्या वेळी ज्या रस्त्यांवर अंधार असतो, तिथे प्रकाश व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा


**| चिरनेर | प्रतिनिधी |**

चिरनेर येथील रिक्षाचालक श्याम चौलकर हे बुधवारी (दि.३) आपल्या नेहमीच्या चिरनेर, कोप्रोली, उरण मार्गावरील प्रवाशांना घेऊन जात असताना, सायंकाळच्या सुमारास प्रवासी उतरल्यानंतर त्यांना रिक्षाच्या शीटच्याखाली मोबाईल पडल्याचे दिसून आले. तोपर्यंत रिक्षातील सर्व प्रवासी हे निघून गेले होते. त्यामुळे रिक्षा चालक शाम चौलकर यांनी आजूबाजूला असणाऱ्या प्रवाशांकडे चौकशी केली. मात्र चौकशी करणाऱ्या प्रवाशांपैकी हा मोबाईल कोणाचाच नसल्यामुळे, त्यांनी जवळच असलेली चिरनेर पोलीस चौकी गाठली. यावेळी



पोलिसांनी त्या मोबाईलद्वारे संपर्क साधला असता तो मोबाईल एका भारत सिंग या परप्रांतीय व्यक्तीचा असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार त्या परप्रांतीय व्यक्तीला चिरनेर पोलीस चौकीत बोलावून, त्या व्यक्तीची पूर्ण खात्री करून त्याला त्याचा मोबाईल पोलिसांच्या समक्ष परत केला. त्यामुळे या प्रामाणिक रिक्षाचालकाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## अनियमित वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ संतप्त



**पनवेल :** वाढत्या उन्हाच्या उकाड्यामुळे अंगाची लाही लाही होत असताना, पनवेलच्या ग्रामीण भागात सातत्याने वीजपुरवठा अनियमित होत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यातच वीज बिलदेखील वाढले असल्याने ते भरायचे कसे, असा प्रश्न ग्राहकांसमोर आहे.

पनवेलच्या ग्रामीण भागात घरगुती हजारो वीज ग्राहक आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने नेरे परिसरात वीजदेखील गायब होत आहे. तापमान ३५ ते ४० अंशांवर गेला असल्याने उन्हाच्या झळा तीव्र जाणवत आहेत. वीजपुरवठा अनियमित होण्याचे प्रमाण दिवसा तसेच रात्रीदेखील वाढले आहे. रात्री बेरात्री वीजपुरवठा अनियमित होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, आजारी रुग्ण, लहान मुले यांचे हाल होत आहेत. तापमान वाढीमुळे अंगाची लाही लाही होत असताना, वीजपुरवठा अचानक अनियमित होतो. त्याचा आणखीन त्रास होतो. ट्रान्सफॉर्मरच्या क्षमतेहून अधिक भार झाल्यावर ट्रीपिंग होत असल्याचे प्रकार घडतात. त्यातच कूलर, पंखा, एसी यांचे प्रमाण वाढले आहे, त्याचा ताणही वीज वितरण व्यवस्थेवर येत असल्याचे सांगण्यात येत असले, तरी बिल आकारता, मग पुरेपूर सेवा का देत नाही? असा संतप्त प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

## १०२ बटालियनतर्फे रोप लागवड

**| पनवेल | प्रतिनिधी |**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खारघर येथील १०२ बटालियन सीघ्र कृती दलातर्फे रोप लागवड करुन पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

जागतिक पर्यावरण दिनी पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित भविष्यासाठी बांधिलकी व्यक्त करत, यंदाच्या पर्यावरण दिनाच्या संकल्पनेनुसार प्रदूषण कमी करण्यावर, नैसर्गिक संसाधनांचे जतन करण्यावर आणि शाश्वत जीवनशैलीचा प्रसार करण्यावर १०२ बटालियन सीघ्र कृती दलातर्फे विशेष भर देण्यात आला. यावेळी १०२ बटालियन आरएएफ कमांडंट, अधिकारी आणि जवानांनी उत्साहाने वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेत अनेक वृक्षरोपांची लागवड केली. जैवविविधतेचा ऱ्हास आणि वाढते प्रदूषण या गंभीर पर्यावरणीय आव्हानात्मक समस्यांवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाणी आणि ऊर्जेची बचत करणे तसेच पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे, काळाची गरज आहे, असे मनोगत यावेळी कमांडर सुशांत कुमार प्रधान यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित जवानांनी लागवड केलेल्या रोपांची काळजी घेण्याचा नियमित संकल्पही केला.

जागतिक पर्यावरण दिन पृथ्वीच्या संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी अधोरेखित करणारा दिवस असून, १०२ बटालियन आरएएफतर्फे स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण निर्मितीसाठी आपली कटिबद्धता पुन्हा एकदा व्यक्त करण्यात आली.

## दूषित पाणीपुरवठ्याबाबत निवेदन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेचे विभागप्रमुख, पाणीपुरवठा विभागाचे विलास चव्हाण यांची नगरसेवक विकास घरत, रवींद्र जोशी, नगरसेवक प्रदीप भगत, नगरसेविका हेमलता गोवारी, नगरसेविका कुसुम म्हात्रे तसेच समाजसेवक भाऊ भगत यांच्यासोबत भेट घेऊन कामोठे परिसरातील सिडकोकडून होणाऱ्या दूषित पाणीपुरवठ्याबाबत निवेदन सादर करण्यात आले.



कामोठे परिसरातील अनेक भागांमध्ये दूषित व गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत असून त्याची तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या या गंभीर विषयावर पनवेल महानगरपालिकेने सिडकोसोबत समन्वय साधून अधिक प्रभावी नियंत्रण व देखरेख ठेवावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी, नमुने चाचणी व संबंधित विभागांशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना राबविण्याची विनंती करण्यात आली. कामोठेकरांना स्वच्छ, सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही आणि या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल.

## मान्सूनपूर्व शेती मशागतीच्या कामाची लगबग

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा तालुक्यात बळीराजाने आपल्या शेतात मान्सूनपूर्व शेती मशागतीच्या कामाला सुरुवात केली आहे. यंदा मान्सून लवकर येण्याची चिन्हे दिसू लागली असल्याने रणरणत्या उन्हात मशागतीचा वेग घेतला असल्याचे चित्र दिसून येत आहे. नदी, धरणाच्या पाण्यावर असणारी उन्हाळी शेती तयार होत असून कोरडवाहू शेतीत बळीराजा कामात गुंतला आहे. मान्सून पूर्णपणे महाराष्ट्रात येण्यास अजून काही दिवसांचा अवधी बाकी असल्याने भाजवळ, कुंपणकाठी, बांध-बंदीस्ती पालापाचोळा जाळणे,



झाडे-झुडपे तोडणी, झाडलोट, शेतातील माती काढणे, गुरांचा वाडा साकारणी, कौलघराची साफसफाई वगैरेच्या कामाला वेग आला आहे. देशाची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेती उत्पादनावर अवलंबून असली तरी शासनाच्या उदासीन धोरणांचा फटका हा शेतकरी वर्गाला बसतो. अनेक योजनांचा जाचक अटीमुळे लाभ मिळत नसला तरी भविष्याची चिंता करावी लागत असल्याने पारंपरिक शेती व्यवसाय टिकून ठेवण्यासाठी तालुक्यातील शेतकरी वर्ग प्रयत्नशील असतो.

## मैत्रीचा अनोखा उत्सव साजरा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मुंबईमधील काळाचौकी येथील अभुदय म्युनिसिपल सेकंडरी हायस्कुलमधील १९७४-७५ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांनी तब्बल ५१ वर्षांनंतर एकत्र येत मैत्रीचा अनोखा उत्सव पनवेल परिसरात साजरा केला.

पनवेल तालुक्यातील नेरे येथील एका फार्महाऊस रिसॉर्टमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय स्नेहमेळाव्यात अधुदय म्युनिसिपल सेकंडरी हायस्कुल मधील सुमारे १८ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. स्नेहमेळाव्यात वयाच्या ६९ ते ७० वर्षांच्या उंबरठ्यावर असलेल्या या मित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा देत दोन दिवस आनंदात घालवले. एकमेकांना भेटताच त्यांच्यातील वर्षानुवर्षांचा दुरावा क्षणात नाहीसा झाला. स्नेहमेळाव्यात शालेय जीवनातील आठवणी, गंमती-जमती, शिक्षकांचे स्मरण आणि जुन्या मित्रांसोबतच्या गप्पांमुळे सर्वजण भावूक झाले. स्नेहमेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रम दरम्यान कराओकेवर अनेक मित्रांनी गाणी सादर केली, गप्पा, हास्यविनोद आणि आठवणींच्या ओघात भूक-तहानही विसरल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

**अरिझोनात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात** **स्मॅप फिनिक्सचा कौतुकास्पद उपक्रम**

# शिवविचारांचा भगवा सातासमुद्रापार!

**| महाड | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास आणि त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याचा वारसा आता खऱ्या अर्थाने सातासमुद्रापार पोहोचला आहे. अमेरिकेतील अरिझोना या राज्यात यंदा प्रथमच भव्य शिवराज्याभिषेक सोहळा २०२६ अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय परिवार (स्मॅप फिनिक्स) यांच्या वतीने आयोजित या कौतुकास्पद उपक्रमामुळे परदेशातही महाड, रायगडचा ऐतिहासिक वारसा आणि शिवअस्मिता जागतिक पातळीवर पोहोचवण्याचे काम यशस्वीपणे झाले आहे.



या वैशिष्ट्यपूर्ण आणि ऐतिहासिक सोहळ्याच्या आयोजनासाठी अमेरिकेच्या फिनिक्स येथील शिर्डी साईबाबा मंदिराच्या प्रसाद हॉलची निवड करण्यात आली होती. अनेक वर्षांपासून मातृभूमी भारतापासून दूर असलेल्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या मातीशी आपली नाळ घट्ट जोडून ठेवलेल्या हजारो मराठी बांधवांनी व भारतीय नागरिकांनी या सोहळ्यासाठी अलोट गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, कपाळावर चंद्रकोर आणि हातामध्ये भगवे ध्वज घेऊन आलेल्या अबालवृद्धांमुळे काही काळासाठी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत 'जय भवानी, जय शिवाजी' अशा गगनभेदी जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणून महाड येथील रहिवासी, आयटी इंजिनिअर आणि प्रसिद्ध इतिहास व दुर्ग अभ्यासक सिद्धेश सुर्वे यांना मुख्य व्याख्याते म्हणून खास निमंत्रित करण्यात आले होते. रायगडावरील प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक आणि शंभु राज्याभिषेक सोहळ्याचा प्रदीर्घ मैदान-अनुभव असलेल्या सिद्धेश सुर्वे यांचे अमेरिकेच्या भूमीवरील हे शिवचरित्रावरील पहिलेच जाहीर व्याख्यान होते. त्यामुळे तेथील अनिवासी भारतीयांमध्ये या कार्यक्रमाबाबत आधीपासूनच प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. त्यांनी आपल्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण शैलीत शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य आणि त्यांचे जागतिक विचार मांडून उपस्थित जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले.

व्याख्याते सिद्धेश सुर्वे यांनी, 'पूर्वी समुद्र ओलांडला की धर्म बदलतो ही समजूत छत्रपती शिवाजी महाराजांनी समुद्राच्या तळाशी गाडत स्वतःचे आरमार उभे केले; अगदी तसेच आज आम्ही ती समजूत मागे टाकत अमेरिकेत पहिल्यांदाच शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करून शिवविचारांचा जागर केला आहे', असे ठाम विचार मांडले.

## निवडक




### वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील जांभिवली येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच युवा उद्योजक व स्वरा इंटरप्रायझेसचे सर्वेसर्वा जयदास रामदास कोंडिलकर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून सालाबादप्रमाणे सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून त्यांनी रसायनी-पाताळगंगा परिसरातील तसेच जांभिवली गावातील दहावी व बारावी, पदवीधर परिक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील नागरिकांनी या शिवचरित्र व्याख्यानाचा लाभ घेतला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी जयदास कोंडिलकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



### पनवेल बाजारात मेणकापड खरेदीसाठी गर्दी

**पनवेल** : जून महिना सुरू झाला असला तरी अद्याप दमदार पावसाने हजेरी लावलेली नाही. दिवसभर कडक ऊन आणि वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. रात्रीच्या वेळी काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी कोसळत असल्या तरी त्यातून फारसा दिलासा मिळत नाही. दरम्यान, लवकरच मान्सून सक्रिय होईल या अपेक्षेने ग्रामीण भागातील नागरिकांनी तयारी सुरू केली आहे. शेतकरी तसेच लहान-मोठे व्यावसायिक घरावरील पत्रे, धान्यसाठा व दुकानांचे संरक्षण करण्यासाठी मेणकापड खरेदीकडे वळले आहेत. पनवेल बाजारपेठेत विविध आकार आणि जाडीचे मेणकापड विक्रीसाठी उपलब्ध झाले असून खरेदीदारांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, गेल्या काही दिवसांत मेणकापडाच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे. पाऊस कधीही सुरू होऊ शकतो, या शक्यतेमुळे नागरिकांनी आतापासूनच आवश्यक साहित्याची जमवाजमव सुरू केली आहे.



### स्वामी समर्थ मंदिराचा वर्धापन दिन

**उरण :** उरण येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचा ८ वा वर्धापन दिन शनिवारी (दि.६) भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभर मंदिर परिसरात स्वामी नामाचा गजर घुमत होता. विविध धार्मिक कार्यक्रम, पूजाविधी, आरती, नामस्मरण आणि भजनांच्या माध्यमातून संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. वर्धापन दिनानिमित्त पहाटेपासूनच मंदिरात विशेष पूजा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक फुलांच्या सजावटीने मंदिर परिसर उजळून निघाला होता. यावेळी उरण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वामी भक्तांनी उपस्थित राहून श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. हा वर्धापन दिन सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी समर्थ मठातील सर्व पदाधिकारी, सेवेकरी, स्वयंसेवक आणि स्वामी भक्तांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन, सजावट, धार्मिक विधी, पालखी सोहळा आणि महाप्रसाद व्यवस्थेसाठी मठातील सहकाऱ्यांनी केलेल्या निस्वार्थ सेवेमुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.



### घंटागाड्यांमध्ये ओव्हरलोड कचरा

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या कचरा घंटागाड्या अनेकदा क्षमतेपेक्षा अधिक कचरा भरून शहरातील विविध भागांतून वाहतूक करताना दिसत आहेत. गाड्यांमध्ये ओव्हरलोड कचरा असल्याने स्वच्छतादूतांना बसण्यासाठी जागा राहत नाही आणि काहीवेळा त्यांना कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर किंवा गाडीच्या टपावर बसून प्रवास करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ओला आणि सुका कचरा वेगवेगळा संकलित करण्याच्या नियमांचेही अनेक ठिकाणी योग्य प्रकारे पालन होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पालिका प्रशासनाने कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या वाढवून ओव्हरलोडिंग थांबवावे, तसेच ओला-सुका कचरा वर्गीकरणाबाबत अधिक प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिक आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

## निवडक



### कापडी पिशव्यांच्या वापरासाठी जनजागृती

**खोपोली :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत खोपोली शहरात प्लास्टिकमुक्त वातावरण निर्मितीसाठी एक सकारात्मक आणि दूरदृष्टीचा उपक्रम राबविण्यात आला. वाढत्या प्लास्टिक प्रदूषणामुळे पर्यावरण, प्राणीजीवन तसेच मानवी आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेता, प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यासाठी खोपोली नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ प्रतीकात्मक न राहता नागरिकांना पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी मार्केट परिसरात वेंडिंग मशीनच्या माध्यमातून माफक दरात कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्याचा अभिनव निर्णयही घेण्यात आला आहे. हा उपक्रमात खोपोली नगरपरिषदेचे नगराध्यक्ष कुलदीप शेंडे आणि मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, संदीप पाटील, किशोर पाटील, प्रशांत साठे, गुरुनाथ साठेलकर गौतम मोरे, शिवा चिन्नास्वामी, भक्ती साठेलकर आदींनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.



### राजिप शाळा नवघरचे देदीप्यमान यश

**पाली :** एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यात रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत शाळेतील एकूण चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, २ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असते हे त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. उत्तीर्ण झालेल्या चार विद्यार्थ्यांपैकी सृष्टी गणेश अडसूळ व प्रचिती प्रल्हाद अडसूळ या दोन विद्यार्थिनींनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर थेट गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. गुणवत्ता यादीत नाव पटकावून या दोन्ही विद्यार्थिनींनी मानाची राष्ट्रीय शिष्यवृत्ती आपल्या नावे केली आहे. त्यांच्या या यशामुळे नवघर शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका शीतल पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी केलेल्या योग्य मार्गदर्शनामुळे आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अपार मेहनतीमुळेच हे कौतुकास्पद यश साध्य झाले असल्याचे बोलले जात आहे. या ऐतिहासिक यशानंतर शाळा व्यवस्थापन समिती नवघर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले आहे. याप्रसंगी पालकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आदर्श शाळा नवघरने शिक्षणाचा दर्जा खऱ्या अर्थाने उंचावला असून, ही शाळा आता गुणवंत विद्यार्थी घडवण्याचे प्रमुख केंद्र बनली आहे.

### शहरातील वीजपुरवठाबाबत उपोषण

**नेरळ :** माथेरान शहरात सध्या पर्यटकांची गर्दी असून पर्यटक थंड हवेचे ठिकाणी गर्दी करून आहेत. मात्र गेल्या काही महिन्यात माथेरानमधील वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कायम आहे. त्यामुळे पर्यटन हंगामावर परिणाम होत आहे हे लक्षात घेऊन माथेरान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने आंदोलन उभारणार आहे. गतवर्षी मनसेने असेच उपोषण महावितरणच्या कार्यालयाबाहेर केले होते. १० जून पासून पुन्हा मनसेचे वतीने आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केले आहे. मनसेचे शहर अध्यक्ष संतोष कदम हे आपल्या सहकाऱ्यांसह शहरातील वीज पुरवठा बाबत उपोषण केले जाणार आहे. माथेरानमधील वीज पुरवठा खंडित होत आहे. गेले अनेक महिने वीज पुरवठा समस्या कायम आहे. माथेरान साठी कळंबोली आणि नेरळ किंवा कर्जत इतर ठिकाणाहून वीज पुरवली जाते. त्यामुळे दुर्गम भागात असलेल्या माथेरान फिडर आणि डिओ सारखे बंद पडत असतात. माथेरानमध्ये अनेक वर्ष सुरू असलेला वीज पुरवठा खंडित होण्याचा हा परिणाम आहे. वीज खंडीत होत असल्याने कित्तेक विजेवर चालणारे उपकरणे बंद पडत आहेत याची जबाबदारी कोण घेणार तुम्ही भरून देणार आहात का? कारण जर आदमी तुमचे प्रामाणिक ग्राहक आहोत तर तुमची जबाबदारी आहे?पण महावितरण कडून कोणतीही जबाबदारी स्वीकारली जात नाही.त्यामुळे वीज पुरवठा बाबत माथेरानमधील वीज ग्राहकांची सहनशक्ती संपली आहे असा इशारा मनसेचे माथेरान शहर अध्यक्ष संतोष कदम यांनी दिला आहे.



### ट्रान्सवर्डकडून वृक्ष संवर्धनाचा संकल्प

**रोहा :** धाटाव एमआयडीसीतील अनेक कंपन्यांनी शुक्रवारी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. त्यात प्रगती व पडत्या काळातही कामगारांच्या हितासाठी कायम अग्रेसर असलेल्या ट्रान्सवर्ड फर्टीकेम कंपनीचे अधिकारी व कामगारांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनाचा दृढ संकल्प केला आहे. पर्यावरण संरक्षण आणि शास्वत विकासाबाबत जनजागृती करण्यासाठी वृक्षारोपण उपक्रमाचे ट्रान्सवर्डने आयोजन केले होते. यावेळी कंपनीचे अधिकारी, कर्मचारी कामगारांनी पारंपारिक महाराष्ट्रीयन फेटा परिधान करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती... हा अनमोल संदेश दिला. या वेळी एमपीसीबीचे अधिकारी डॉ. गजानन खडकीकर, राजेश औटी, अमित खंडागळे, ऋतुजा भालेराव आदी प्रमुख मान्यवर उपस्थिती होते.

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **तातडीची भरती, अलिबाग** रेस्टॉरंट/प्रॉपर्टी/एरिया मॅनेजर हेड शेफ, हाऊसकीपिंग, किचन हेल्पर मोफत राहण्याची व जेवणाची सोय TMS पेरोल अंतर्गत नोकरी. संपर्क : 8976709218 / 8691087302

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# दासगावच्या किल्ले दौलतगडावर श्रमदान

**➢तरूणाईने दाखवली शिवकार्याची नवी दिशा ➢इतिहासाच्या पाऊलखुणा झाल्या जिवंत**

| महाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गालगत, ऐतिहासिक महाड तालुक्यात सावित्री नदीच्या विस्तीर्ण तीरावर दिमाखात उभा असलेला आणि भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणी वसलेला ऐतिहासिक किल्ले दौलतगड (दासगाव) यंदाच्या शिवराज्याभिषेक दिनी एका क्रांतीकारी उपक्रमाचा साक्षीदार ठरला. एका बाजूला ढोल-ताशांच्या कडकडाटात आणि भगव्या झेंड्यांच्या अथांग सागरात मुख्य किल्ले रायगडावर शिवछत्रपतींच्या अलौकिक सार्वभौमत्वाचा सोहळा लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीत साजरा होत असताना, त्याच्याच सावलीत असलेल्या या दौलतगडावर मात्र, दुर्गसेवकांनी केवळ घोषणा न देता प्रत्यक्ष कृतीतून आपली निष्ठा सिद्ध केली. दौलतगड दासगाव प्रतिष्ठान आणि रॉयल रायगडकर प्रतिष्ठानच्या दुर्गसेवकांनी या पवित्र दिवशी एकत्रित येत विशेष श्रमदान आणि गड संवर्धन मोहीम यशस्वीपणे राबवून महाराष्ट्राला शिवभक्तीची एक नवी दिशा दाखवून दिली आहे.



आजच्या काळात शिवरायांची नवीन स्मारके किंवा पुतळे बांधण्यापेक्षा, त्यांनी रक्ताचे पाणी करून निर्माण केलेले गडकिल्ले वाचवणे आणि त्यांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे, हा अत्यंत परिपक्व विचार घेऊन हे दुर्गसेवक कार्यरत आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी असूनही सध्या काहीशा उपेक्षित राहिलेल्या या दौलतगडाला तरुणांच्या जिद्दीमुळे आणि अविरत कष्टामुळे लवकरच पुन्हा नव्याने गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. हातात झाडू, कुदळ आणि पाटी घेऊन जेव्हा हे तरुण गडावर घाम गाळतात, तेव्हा तो केवळ परिसर स्वच्छ होत नसतो, तर इतिहासाच्या पाऊलखुणा जिवंत होत असतात.

या मोहिमेचे आणखी एक मोठे यश आणि दिशादर्शक वैशिष्ट्य म्हणजे, यात केवळ तरुणच नव्हे तर लहान मुले आणि चिमुकले बालमावळेही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जे वय खेळण्याचे-बागडण्याचे, त्या वयात ज्येष्ठ दुर्गसेवकांकडून या बालकांवर थेट गडाच्या मातीतच संवर्धनाचे संस्कार केले जात आहेत.

बालवयातच लागलेली ही गोडी पुढे अनेक वर्षे महाराष्ट्राची ही गौरवशाली दुर्ग संवर्धनाची परंपरा अखंड चालू ठेवण्यास नक्कीच मदत करणार आहे.

ज्यांना रायगडावरील मुख्य सोहळ्याला जाणे गर्दीमुळे किंवा इतर कारणांमुळे शक्य नाही, त्यांनी निराश न होता आपल्या घराच्या आसपास असणाऱ्या कोणत्याही उपेक्षित गडावर जावे, तिथे श्रमदान करावे आणि शिवराज्याभिषेकाचा खरा, सुखद सोहळा अनुभवावा, असे आवाहन याप्रसंगी दुर्गसेवकांनी केले.मोहीम महाराष्ट्रातील प्रत्येक शिवभक्ताला विचार करायला लावणारी आहे. उत्सव आणि सोहळे नक्कीच व्हावेत, पण त्या सोहळ्यांचे रूपांतर जर अशा श्रमदान आणि संवर्धन मोहिमांमध्ये झाले, तर महाराष्ट्राचे वैभव असलेले शेकडो गडकिल्ले पुन्हा एकदा दिमाखात उभे राहतील.

> “घोषणांपेक्षा शिवरायांचे विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हीच खरी शिवभक्ती आहे. मुख्य गडांवर जाऊन केवळ गर्दी वाढवण्यापेक्षा, आपल्या परिसरातील उपेक्षित किल्ल्यांना श्रमदानातून गतवैभव मिळवून देणे हेच आजच्या काळातील खरे शिवकार्य आहे.
> – निलेश निवाते
> संस्थापक अध्यक्ष, दौलतगड दासगाव प्रतिष्ठान”

> “शिवरायांचा इतिहास पुस्तकात वाचण्यापेक्षा गडकिल्ल्यांच्या दगडा-धोंड्यांमधून अनुभवण्याचा आहे. तरुण पिढीने सोशल मीडिया सोडून हातात झाडू आणि कुदळ घेऊन गडावर घाम गाळणे, हाच खरा मावळा तयार होण्याचा मार्ग आहे.
> – कर्तव्य जाधव
> अध्यक्ष, रॉयल रायगडकर प्रतिष्ठान”

> “दौलतगड संवर्धन हे आमचे आद्य कर्तव्य आहे. जिथे आपल्या पूर्वजांचा इतिहास दडलेला आहे त्या दौलतगडाचे संवर्धन आपल्या हातून घडतंय हे आमचे सौभाग्य आहे. इथला इतिहास आणि संस्कृती लोकांपर्यंत पोहोचवण्याकरिता आम्ही सदैव प्रयत्न करू.
> – मनीषा निवाते
> दुर्गसेविका”

# किकवीत बंधाऱ्याच्या कामास मंजुरी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील चिल्हार नदीवर किकवी गावच्या खाली असलेल्या पाणी साठवण बंधाऱ्याची खाली वाढवण्याचे काम मंजूर झाले आहे. या कामाला सुरुवात झाली असून बंधाऱ्याचे वरच्या भागातील माती काढणे आणि दगड फोडून पाण्याचा साठा जास्त होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या बंधाऱ्यात पाण्याचा साठा अधिक प्रमाणात झाल्यास त्याचा फायदा परिसरातील शेतकऱ्यांच्या रोपवाटिकांना होणार आहे.



राज्य सरकारच्या जलसंधारण विभागाच्या माध्यमातून २०२१ मध्ये चिल्हार नदीवर काही पाणी साठवण बंधारे बांधण्यात आले होते.त्यात किकवी तसेच सुगवे आणि चाफेवाडी येथे बांधण्यात आलेले पाणी साठवण बंधारे यात मागील पाच वर्षात मोठ्या प्रमाणावर गाळ येऊन साचून राहिला होता. पावसाळ्यात पाण्याबरोबर वाहून जाणारे दगड माती ही सिमेंट बंधाऱ्यामुळे तेथेच अडकून पडले आहेत. त्याचा परिणाम बंधाऱ्यातील पाणी साठवून ठेवण्याची क्षमता कमी झाली होती. किकवी येथील पाणी साठवण बंधाऱ्याच्या खोलीकरण कामाला सुरुवात झाली आहे. खोलीकरण करताना बंधाऱ्याच्या वरच्या भागात असलेल दगड फोडणे तसेच गाळ काढण्याची कामे सुरू आहेत. ही कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात यांत्रिकी मशिनरी आणि ट्रॅक यांचा वापर केला जात आहे.त्यामुळे वेगाने कामे सुरू असून पावसाळा सुरू होण्याआधी खोलीकरण कामे करण्याचे जलसंधारण विभागाचे उद्दिष्ट असल्याचे दिसून येत आहे.

## वलप गाव परिसरात वृक्षारोपण



| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटी व पनवेल शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील वलप गाव परिसरातील ओसाड मालरानावर शेकडो वृक्षांचे रोपण करण्यात आले. बदलत्या हवामानाचा विचार करता पर्यावरण संवर्धन व नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. वृक्षारोपणामुळे वातावरण शुद्ध राहण्यास, जैवविविधतेचे संरक्षण करण्यास मदत होणार आहे. यावेळी सुदाम पाटील, अ‍ॅड. के. एस. पाटील, हेमराज म्हात्रे, रामचंद्र पाटील, गुलजार म्हात्रे, सुरेश पाटील, राजीव पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वडखळमध्ये एसटीचा वर्धापन दिन साजरा

| हमरापूर | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाच्या असणाऱ्या वडखळ एसटी स्थानकात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटीचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गेली कित्येक वर्षांपासून एसटी ही सर्वसामान्य जनता, नागरिक, विद्यार्थी कामगार, महिला वर्ग एसटीनेच प्रवास करतात. एसटीचा प्रवास हा सुखाचा प्रवास अद्यापही एसटीने आपली ही परंपरा जोपासून ठेवली आहे. दि. १ जून हा एसटी महामंडळाचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने वडखळ एसटी स्थानकात पेण आगाराचे लेखाकार आशिष गावंड व वडखल बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक अतुल पाटील यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनानिमित्त प्रवाशांना पेढे वाटण्यात आले. तसेच ज्येष्ठ प्रवाशांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. पेण एसटी आगाराचे लेखाकर आशिष गावंड, वडखळ बस स्थानकातील वाहतूक नियंत्रक अतुल पाटील यांच्यासह कर्मचारी तसेच प्रवासी यावेळी उपस्थित होते.

## बीकेपी स्कूलला शैक्षणिक मदत

**चिरनेर :** संकल्प चॅरिटेबल ट्रस्टची मोहा गावातील बीकेपी स्कूल ही अतिशय अल्प फी घेऊन गरिबातल्या गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्याचे काम करते. मात्र काही भौतिक आणि शैक्षणिक सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना पुरविताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. शाळेचा शिक्षकवृंद जयश्री वाजेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगती करीत आहे. त्यामुळे बीकेपी स्कूल मोहा येथील शाळेला प्रोजेक्टर, वॉटर प्युरिफायर, खुर्च्या, लायब्ररी आणि लॅबसाठी कपाटे, स्टाफसाठी लॉकर अशी बहुमूल्य शैक्षणिक मदत कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडतर्फे शुक्रवारी करण्यात आली.

## प्रा. अरुण माळी यांचा गौरव

| म्हसळा | प्रतिनिधी |

व्हीजन इंटरनॅशनल स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज, म्हसळा येथील प्राध्यापक अरुण नरहरी माळी यांना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार पनवेल येथील व्ही. के. हायस्कूलमध्ये दि.५ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीप्रा.माळीयांनीसातत्याने कार्य केले आहे.शिक्षणासोबतच



कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित शिक्षण रुजविण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाने त्यांचा सन्मान केला.

याप्रसंगी माजी आ. बाळाराम पाटील, बी. एल. सगर , अनिल नाचपल्ले, संतोष भोजने आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रा. अरुण माळी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## मिलिंद कदम सेवानिवृत्त

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

सार्वजनिक बांधकाम विभागाचे (पिडब्ल्यूडी) उपविभागीय अभियंता मिलिंद कदम हे सेवानिवृत्त झाले. त्यांनी अनेक वर्ष सेवा केली. त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे पनवेल मध्ये आयोजन करण्यात आले होते. बंदर रोड पनवेल येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात उपविभागीय अधिकारी म्हणून गेली काही वर्षे मिलिंद कदम काम पाहत होते. त्यांच्या कार्यकाळात तालुक्यातील गावांमध्ये अनेक ठिकाणचे चांगले रस्त्यांची कामे झाली. त्यांच्या मृदू स्वभावामुळे त्यांच्यासोबत अनेक मित्र जोडले गेले. सेवापूर्ती सोहळ्यात अनेक कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

## दांडगुरीतील आंबा बागायतीला आग

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी|

श्रीवर्धन तालुक्यातील दांडगुरी येथे सर्फराज व जावेद कमाल काजी यांच्या मालकीच्या आंबा बागायतीला शनिवारी (दि.६) जून रोजी दुपारी ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान आग लागली. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून आग अज्ञात व्यक्तीने जाणूनबुजून लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



आगीची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी स्वप्निल रासने आणि आकाश पोळ यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, कडक ऊन, परिसरातील वाळलेले गवत आणि वेगाने पसरणाऱ्या ज्वाळांमुळे आग नियंत्रणाबाहेर गेली. परिणामी आंबा आणी काजूची अनेक झाडे होरपळली. या आगीत काजी कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्याचबरोबर परिसरातील जैविविधता, वनस्पती आणि पर्यावरणालाही फटका बसला आहे. विशेष म्हणजे ही आग गावठाणाच्या अगदी वस्तीजवळ लागली होती. आग वस्तीपर्यंत पोहोचली असती तर मोठा अनर्थ घडू शकला असता. तरीही आग लागल्यानंतर ती विझवण्यासाठी एकही ग्रामस्थ मदतीला पुढे आला नाही, याबत आश्चर्य व्यक्त होत आहे. या घटनेची बोर्लीपंचतन येथील दिघी सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

**वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार | पुलाचे काम अंतिम टप्प्यात**

# उल्हास नदीवरील श्रीराम पूल खुला होणार

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर असलेल्या जुन्या पुलाच्या बाजूला नवीन पूल बांधला जात आहे. या नवीन पुलाचे काम २०२१ पासून सुरू असून यावर्षी पावसाळ्याआधी हा पूल वाहतुकीस खुला होणार आहे.आठ कोटी खर्चून हा पूल बांधण्यात येत असून जून म हिन्यात हा पूल खुला होईल अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, कर्जत शहरात श्रीराम पुलावर होणारी वाहतूक कोंडी नवीन पूल वाहतुकीस खुला झाल्यानंतर येथील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.



शहापूर- मुरबाड- कर्जत खोपोली या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ वरील कर्जत येथील उल्हास नदीवर असलेल्या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. २०२१ मध्ये या पुलाच्या कामाचे भूमिपूजन मुंबईच्या तत्कालीन म हापौर पेडणेकर यांच्या हस्ते झाले होते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या शहापूर मुरबाड कर्जत खोपोली राष्ट्रीय महामार्ग वरील रस्त्यावर पूल बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या माध्यमातून या पुलाच्या कामासाठी आठ कोटींचा निधी मंजूर होता. या पुलाच्या बांधकाम ाची गरज मागील दहा वर्षापासून असून २०२१ मध्ये बांधकाम सुरू झालेल्या या पुलाच्या पूर्णत्वाचा विषय कायम चर्चेत येत होता. त्याचे कारण या पुलाच्या बाजूला असलेला उल्हास नदीवरील श्रीराम पूल हा मागील काही वर्षे वाहतील कोंडीचा हॉटस्पॉट बनला होता. त्यामुळे नवीन पुलाची गरज पुढे आली होती आणि त्यामुळे हा पूल कधी पूर्ण होणार? याकडे दहिवली गावातील नागरिकांचे सर्वाधिक लक्ष असायचे. कारण विकेंडचे दिवशी कर्जत शहरात असलेल्या शाळांमध्ये दहिवली भागातील म ुलांना शाळेत पोहचवणे हे वाहतूक कोंडीमुळे अडथळा बनले होते.

अखेर या पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून या महिन्यात नवीन पूल वाहतुकीस खुला होणार आहे.वाहतुक कोंडीवर मात करण्यासाठी नवीन पुलाची निर्मिती महत्वाची ठरली असून कर्जत शहराकडील भाग रस्त्याला जोडला गेला आहे.

तर मुरबाड कडील भाग याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाच्या कामाला अंतिम रूप देण्यासाठी मागील सहा सात महिन्यात जोरदार प्रयत्न केले आहेत. माजी आ. सुरेश लाड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या पुलाच्या रखडलेल्या कामाबद्दल पत्र देऊन पूर्णत्वाकडे नेण्याची मागणी केली होती.पुलाचे काम वेगाने आणि तांत्रिक दृष्ट्या चांगले व्हावे यासाठी बांधकाम विभागाचे उप अभियंता राहुल देवांग यांनी ठेकेदार कंपनीला यावर्षी पावसाळ्या आधी कामे पूर्ण करण्याकडे लक्ष घातले होतें. त्यामुळे काही दिवसात हा पूल वाहतुकीस खुला होणार आहे.

**पूल ठरणार मदतगार**

**कर्जत शहरातील वाहतूक कोंडीचा हॉटस्पॉट असलेली श्रीराम पुलावरील कमी करण्यासाठी जुन्या श्रीराम पुलाच्या बाजूला असलेला नवीन पूल मदतगार ठरणार आहे.**

# कर्जतकर रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा

## || पॅसेंजर असोसिएशनच्या पाठपुराव्याला यश || भिसेगाव तिकीट खिडकी आता दोन शिफ्टमध्ये सुरू

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत रेल्वे स्थानक परिसरातील हजारो प्रवाशांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून, भिसेगाव बाजूच्या तिकीट बुकिंग खिडकीचे कामकाज आजपासून दोन शिफ्टमध्ये सुरू करण्यात आले आहे. या निर्णयामुळे प्रवाशांची गैरसोय कमी होण्यास मदत होणार असून, तिकीट काढण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि सोयीस्कर होणार आहे.

मागील अनेक महिन्यांपासून कर्जत रेल्वे पॅसेंजर्स असोसिएशनकडून या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. विशेषतः सकाळ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत प्रवाशांना लांबच-लांब रांगा, वेळेचा अपव्यय आणि तिकीट मिळवण्यासाठी होणारा त्रास यामुळे ही मागणी अधिक जोर धरत होती.




**तिकीट बुकिंग खिडकीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :**
**पहिली शिफ्ट :** सकाळी ६.३० ते दुपारी २.३०
**जेवणाची वेळ :** दुपारी १२.१५ ते १२.३५
**हिशोबाची वेळ :** दुपारी २.३० ते २.४५
**दुसरी शिफ्ट :** दुपारी २.४५ ते रात्री १०.३०
**जेवणाची वेळ :** रात्री ८.४० ते ९.००

प्रवाशांची वाढती संख्या आणि वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अखेर सकारात्मक निर्णय घेतला आहे. यासाठी कमर्शियल चिफ इन्स्पेक्टर शिरीष कांबळे यांनी वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवत विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रश्नमार्गी लागल्याचे सांगितले जात आहे.

या नव्या व्यवस्थेमुळे भिसेगाव परिसरातील तसेच स्थानकाच्या त्या बाजूने ये-जा करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. विशेषतः कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी आणि नियमित प्रवाशांसाठी ही सुविधा अधिक उपयुक्त ठरणार आहे.

या निर्णयामुळे कर्जत रेल्वे स्थानक परिसरातील प्रवाशांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचे प्रवाशांकडून स्वागत केले जात आहे.

# पीटसईत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

| तळा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम २०२६-२७ च्या अनुषंगाने मौजे पीटसई येथे सीआरए तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, उगवण क्षमता चाचणी व गोकृपामृत प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी भात पिकासाठी बीज प्रक्रिया व उगवण क्षमता चाचणीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. सचिन लोखंडे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) यांनी बीज प्रक्रियेचे महत्त्व, उगवण क्षमता चाचणीची पद्धत, दर्जेदार बियाण्यांची निवड तसेच पेरणीपूर्वी करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करूनच लागवड करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर सहाय्यक कृषी अधिकारी अतुल बाबर यांनी गोकृपामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यांनी गोकृपामृत तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, तयार करण्याची प्रक्रिया, वापरण्याची पद्धत तसेच सेंद्रिय शेतीमधील त्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. तसेच भात पिकाच्या सुधारित लागवड पद्धती, खत व्यवस्थापन, तण नियंत्रण आणि पाणी व्यवस्थापन याविषयीही माहिती दिली.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझा अल्पवयीन मुलगा "कु. शौर्य अनिमेष खडसरे" या नावाने ओळखला जात होता. मा. मे न्यायालयाच्या आदेशानुसार माझा व माझ्या पतीचा कायदेशीर घटस्फोट झालेला असून सदर अल्पवयीन मुलाची कायमस्वरूपी ताबा माझ्याकडे आहे.

तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र (Gazette) मध्ये प्रकाशित नाव बदलानुसार सदर अल्पवयीन मुलाचे नाव आता "कु. शौर्य विश्रुता हजारे" असे करण्यात आलेले आहे.

यापुढे सर्व शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक व इतर सर्व व्यवहारांमध्ये सदर अल्पवयीन मुलास "कु. शौर्य विश्रुता हजारे" या नवीन नावाने ओळखण्यात यावे.

कोणास काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. त्यानंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**नाव : सौ. विश्रुता प्रकाश हजारे**
पत्ता : घर नं ३९ मारुती मंदिरा जवळ
रा भिसेगाव तालुका कर्जत जि रायगड
दिनांक : ०८/०६/२०२६

# नागाव बीच पर्यटकांसाठी आकर्षण

| रेवदंडा | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील नागाव बीच सध्या पर्यटकांसाठी हॉट डेस्टिनेशन बनला आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे येथून वीकेंडला येणाऱ्या पर्यटकांची येथे मोठी गर्दी दिसून येत आहे. अलिबाग शहरापासून अवघ्या ८ किमी अंतरावर असलेल्या नागाव बीचचे नावच आता पर्यटकांच्या पसंतीत आहे.



नागाव बीचच्या पाठीमागे दूरवर पसरलेल्या नारळीच्या बागा हे इथलं मुख्य आकर्षण आहे. कोकणचा काश्मीर अशी याची ओळख झाली आहे.

अलिबागच्या इतर बीचच्या तुलनेत नागाव बीचवर स्वच्छता जास्त आहे. सकाळी लवकर फिरायला येणाऱ्या पर्यटकांना शांतता मिळते.

- **नारळी-फोपळीच्या बागा**
- **स्वच्छ किनाऱ्यामुळे गर्दी**

पॅरासेलिंग, जेट स्की, स्पीड बोट, बनाना राईड, ॲटव्ही राईड यासारखे वॉटर स्पोर्ट्स तरुणाईला भुरळ घालत आहेत.

संध्याकाळी नारळीच्या बागा आणि समुद्राचा संगम पाहणं म्हणजे पर्वणीच. इंस्टा-फ्रेंडली स्पॉट म्हणूनही नागाव फेमस झालंय.मुंबई, ठाणे, पुणे आदी शहरातून आलेल्या पर्यटकांची मागणी मोठी आहे. वीकेंडला नागावकडे जाणाऱ्या रस्त्यावर गाड्यांच्या रांगा लागतात. स्थानिक हॉटेल, रिसॉर्ट, होमस्टे १०० टक्के बुक होतात.

नागाव बीचमुळे स्थानिक कोळी बांधव, शेतकरी आणि तरुणांना रोजगार मिळाला आहे. बीचवर नारळपाणी, भुट्टा, मच्छी फ्राय, सोलकढीचे स्टॉल लागले आहेत. वॉटर स्पोर्ट्सचे व्यवसायही वाढले आहेत. ग्रामस्थांच्या मते, पावसाळ्यापूर्वी एप्रिल-मे महिन्यात नागाव बीचवर सर्वाधिक गर्दी असते. पावसाळा सुरू झाला की समुद्र खवळतो, त्यामुळे पर्यटकांची संख्या कमी होते. स्वच्छता राखा, बीचचा आनंद घ्या स्थानिक ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणाले, नागाव बीचची प्रसिद्धी वाढली आहे.



# तक्का येथे फळझाड वृक्षारोपण

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने देशभरात वृक्षारोपण अभियान साजरे केले गेले. एक पेड माँ के नाम या शीर्षकाखाली राबविलेल्या या अभियानामध्ये अल्पसंख्यांक समाजाने हिरीरीने सहभाग घेतला होता.

५ जून रोजी पनवेल महानगरपालिका हद्दीतील अत्यंत प्रतिष्ठित तसेच विकसनशील समजल्या जाणाऱ्या तक्का परिसरामध्ये हे अभियान राबविण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाला प्रकाश बिनेदार, सय्यद अकबर, अजय बहिरा, मौलाना नईम शेख, सिझान जावेद फकीर मुजावर, साबीर शेख, राहुल बोर्डे, मुदस्सर पटेल, आफताब ताडे, अयुब पठाण, असिफ काझी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे**
**श्री. डी. डी. विसपुते अध्यापक विद्यालय, नवीन पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**
**(मराठी व इंग्रजी माध्यम)**
**महाराष्ट्र शासन व एन. सी. टी. ई. मान्यताप्राप्त विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांमध्ये**
**व्यवस्थापन कोटा**
**डी. एल. एड. (डी.एड ) प्रवेश २०२६ -२७ साठी**
**जागांकरिता अर्ज मागवित आहे.**

* **शैक्षणिक पात्रता :** इ.१२ वी मागासवर्गीयांसाठी ४४.५० % गुण व खुला गट ४९.५० % गुणांसह उत्तीर्ण MCVC विद्यार्थ्यांना १.कृषी गटातील हार्टीकल्चरल व क्रॉप सायन्स किंवा २. आरोग्य व वैद्यकीय सेवा गटातील क्रॅच अँड प्री स्कूल मॅनेजमेंट विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
* YCMOU मधून FYBA किंवा पदवी उत्तीर्ण.
* **शाखा निहाय व माध्यम निहाय उपलब्ध जागा :**

| माध्यम | विज्ञान | कला | वाणिज्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | ०४ | ०१ | ० | ५ |
| इंग्रजी | ०१ | ०१ | ० | २ |

* **संवर्गनिहाय स उपलब्ध जागा :**

| माध्यम | खुला | एससी +एसटी | व्हीजे+एनटीबी+एनटीसी+एनटीडी | एसबीसी+ओबीसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | १ | १ | १ | २ | ५ |
| इंग्रजी | ० | १ | ० | १ | २ |

उपलब्धतेनुसार सामाजिक ,घटनात्मक व संवर्गनिहाय आरक्षण राहील. अपेक्षित संवर्गातील व शाखेतील अर्ज न आल्यास इतर संवर्ग व शाखातून जागा भरल्या जातील.अर्ज विक्री दिनांक ८.६.२०२६ ते १६.६.२०२६ तसेच स्वीकृती ८.६.२०२६ ते १७.६.२०२६ या कार्यालयीन वेळेत१०.३० ते ५.३० पर्यंत राहील प्रवेश अर्जाची किंमत खुला गट २०० रु व मागासवर्गीयांसाठी १०० रुपयाप्रमाणे असेल. तसेच मराठी माध्यमाची शैक्षणिक शुल्क १५००० रुपये व इंग्रजी माध्यमाचे १५००० रुपये असेल.

**संपर्क**
**प्राचार्य**
**श्रीमती मधाळे कुसुम पारिसा**
श्री डी डी विसपुते अध्यापक विद्यालय, प्लॉट नंबर ४१,सेक्टर १५,रेल्वे स्टेशन जवळ ,नवीन पनवेल, जि रायगड. फोन नं- ९८२१७०४३५०/ ७७३८६०८०८८/९०८२५२८५६८/९९६०९३८०६१

# धाटाव येथे पर्यावरण दिन साजरा

| पाली | प्रतिनिधी |

दरवर्षी ५ जून रोजी जगभरात पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. याच उद्देशाने ट्रान्सवर्ल्ड फर्टीकेम लिमिटेड, धाटाव-रोहा येथे जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृढ संकल्पासह साजरा करण्यात आला.



या निमित्ताने कंपनीचे अधिकारी, कर्मचारी व कामगार यांनी पारंपरिक महाराष्ट्रीयन फेटा परिधान करून वृक्षारोपण कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे आणि निसर्ग संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे हा वृक्षारोपण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी उपस्थितांनी केवळ वृक्ष लागवडच नव्हे तर लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संरक्षण करण्याचा संकल्पही केला.

निसर्गाचे रक्षण आणि पर्यावरणाचे जतन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन करत कंपनीचे संचालक अरुण वाळुंज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी वृक्षारोपण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा जबाबदारीने वापर, जलसंवर्धन तसेच प्लास्टिकचा वापर कमी करणे यांसारख्या पर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांवर प्रकाश टाकला. यावेळी कंपनीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांनीही पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमास डॉ. गजानन खडकीकर, ऋतुजा अरुण वाळुंज, भारतीय कामगार सेनेचे पदाधिकारी व सदस्य, कंपनीचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते.

# काशीद बीचवर पर्यटकांची गर्दी

## समुद्रस्नानाचा लुटला आनंद

| कोर्लई | प्रतिनिधी |

पर्यटनात जगाच्या पटलावर नावारूपाला आलेल्या मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीचवर जून महिन्याच्या पहिल्या विकेंडला रविवारी सकाळच्या वेळी पर्यटकांची गर्दी पाहावयास मिळाली होती.



वाढलेल्या उष्णतेमुळे हैराण झालेले पर्यटक समुद्रात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेत असल्याचे दिसून आले. काशिद-बिच समुद्र किनारा भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील शुभ्र वाळू येथे पर्यटकांना आकर्षित करते.

पर्यटकांच्या सोयी-सुविधात याठिकाणी असलेली स्पीडबोट, बनाना, बंफर तसेच घोडा-उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. याचा पर्यटक मनसोक्त आनंद लुटत होते.याठिकाणी विविध खाद्य-पेय चहा-नाष्टा सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

याठिकाणी दर शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात. रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. वेळप्रसंगी ट्रँफिक जँमलाही सामोरे जावे लागते. देश-विदेशातील पर्यटक देखील आवर्जून भेट देत असतात. यामुळे काशिदबीचला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

पावसाळा अद्याप सुरु झाला नसला तरी जून महिन्याच्या पहिल्या विकेंडला रविवारी सकाळच्या वेळी प्रचंड उकाड्यामुळे पर्यटकांनी काशिद बीचवर पोहण्याचा मनसोक्त आनंद लुटला.

# महावितरणला टाळे ठोकण्याचा इशारा

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

कामोठे परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, या प्रश्नावर कामोठे वसाहतीमधील नगरसेवकांनी पुढाकार घेत भिंगारी येथील महावितरण कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला.



विकास घरत, डॉ. अरुणकुमार भगत तसेच इतर लोकप्रतिनिधी यांनी महावितरण कार्यालयाला भेट दिली. यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता एस. एस. माने व संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कामोठे परिसरात रात्री-अपरात्री होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. उष्णतेच्या दिवसांमध्ये लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे नगरसेवक विकास घरत यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडांवर तातडीने उपाययोजना करून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी त्यांनी केली.

यावेळी विकास घरत यांनी महावितरण प्रशासनावर नाराजी व्यक्त करत, नागरिकांना नियमित वीजपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि त्याबाबतचे अपुरे नियोजन कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही, असे स्पष्ट केले. डॉ. अरुणकुमार भगत यांनीही नागरिकांच्या समस्या मांडत तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

# नेरळमध्ये होळकरांची जयंती साजरी

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ येथील लक्ष्मी-व्यंकटेश सभागृह येथे क्षत्रिय धनगर समाज संघ नेरळ यांच्यावतीने अहिल्यादेवी होळकरांची ३०१ वी जयंती साजरी करण्यात आली.ज्येष्ठ कार्यकर्ते संजय कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला रायगड जिल्हा हर हर चांगभलं धनगर समाज संस्थेचे सचिव अ‍ॅड. संतोष आखाडे, परमानंद नाचण, प्रशांत नाचण, संतोष शिंगाडे, गणेश खराटे, रामचंद्र पुकळे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात कर्तृत्व मिळवणाऱ्या व्यक्तींचा सन्मान मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकुमार इकारे यांनी केले, सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन पवार यांनी केले.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# कर्जतमध्ये अहिल्यादेवी जयंतीनिमित्त शोभयात्रा

| कर्जत | प्रतिनिधी |

क्षत्रिय धनगर समाज कर्जत तालुका यांच्या वतीने काल शुक्रवारी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी कर्जतमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कर्जत शहरातून हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत ढोल ताशांच्या गजरात अहिल्यादेवी होळकरांच्या प्रतिमेचे पूजन करून भव्य शोभयात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकापासून बाजारपेठेतून कपालेश्वर मंदिरमार्गे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारका पर्यंत ही शोभयात्रा काढण्यात आली.

सुधाकर घारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रवीण कोळपे, मंथन नरुटे, नगराध्यक्षा पुष्पा दगडे, संतोष पाटील, पाटील, लता ढेबे, अनुसया ढेबे, श्रीसंत बबन खरात, अक्षय चोपडे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी विष्णू बोराडे, अ‍ॅड संतोष आखाडे, रामदास कोकरे, धाऊ खरात, सचिन पारखे, बाबू गोरे, बाबू कोकरे, जनार्धन आखाडे, गोविंद गोरे, सुनील गोरे, रामचंद्र पुकळे, आनंदराव कचरे, सुनीता आखाडे, राकेश कोकळे, स्वप्नाली रुपनर, शिवाजी रुपनवर भीमराव ओलेकर, श्रीकांत गावडे, धनाजी बंडगर, संतोष कोळेकर, सचिन बंडगर, विठ्ठल पाटील, बिरूदेव शेजाळ अनिल शेंबडे, महादेव कोळेकर, धुळा मासाळ, दीपक जडगे, सुनील कारंडे, शरद कोळेकर, जयकुमार शेंडगे, संतोष बंडगर, अजित पुकळे, बाळू कारंडे, ठकूराम झोरे, संतोष कोकरे, अशोक शेडगे, अंकुश शेडगे, आदिसह असंख्य समाज बांधवासाह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आपत्कालीन व्यवस्थेबाबत स्थानिकांची नाराजी

| माथेरान | प्रतिनिधी |

पावसाळा सुरू होण्यास काही काळ उरलेला असताना देखील नगरपालिका प्रशासनाची संभाव्य आपत्कालीन व्यवस्थेबाबतीत समयसूचकता दिसून येत नसल्याने स्थानिकांमध्ये नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे.

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असते सरासरी २५० ते ३०० इंच पावसाची नोंद गेल्यावर्षी झालेली आहे.

यासाठी गावातील विविध ठिकाणी धोकादायक वास्तू आहेत. त्याचप्रमाणे आपत्कालीन व्यवस्थेचा भाग म्हणून अद्यापही काही नागरी वस्तीतील गटारांची साफसफाई केलेली दिसत नाही. त्यामुळे या पावसाळ्यात सर्व पाणी रस्त्यावरून वाहणार यात शंकाच नाही.

रेल्वे स्टेशन जवळील प्रभाग सात मध्ये नगरपालिका चाळीच्या मागील बाजूस काही वर्षांपासून कचरा जमा होत असल्याने याठिकाणी डंपिंग ग्राऊंड तयार झाले आहे. डेब्रिज, ओला, सुका कचरा मोठया प्रमाणात साठला आहे. याठिकाणी घरगुती लोजिंग अधिक प्रमाणात असल्याने पर्यटकांची रेलचेल सतत सुरूच असते. या पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे सर्व कचरा आणि डेब्रिज पावसाच्या पाण्याने सहज रस्त्यावरून वाहणार आहे. यामुळे गटारे फुल होणार असून वेळप्रसंगी लोकांच्या घरात सुध्दा हे पावसाळी पाणी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. पालिका प्रशासन सदर बाब गांभीर्याने घेणार आहे की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट-मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# जिल्ह्याभरातील पत्रकार, कर्मचाऱ्यांचा सन्मान



कृषीवलचा ९० वा वर्धापन दिन अलिबागमधील वेश्वी येथील मॅपल आयव्ही हॉटेलच्या सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कृषीवलच्या वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या पत्रकार, छायाचित्रकार, विविध विभागांचे प्रमुख आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. हा सत्कार सल्लागार संपादक प्रसाद केरकर, कार्यकारी संपादक माधवी सावंत यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, सहव्यवस्थापक हर्षा नाईक-पाटील आणि जाहिरात व्यवस्थापक सचिन गुप्ता उपस्थित होते.

# भारताने उभारला धावांचा डोंगर

**|| सामन्यात भारतीय फलंदाजांचे वर्चस्व || अफगाणिस्तानला फॉला-ऑनची भीती**

**। न्यु चंदीगड । वृत्तसंस्था ।**

भारत आणि अफगाणिस्तान संघात शनिवार दि.६ जूनपासून कसोटी सामना खेळवला जात आहे. या सामन्यात भारतीय फलंदाजांचे वर्चस्व राहिले असून, भारताने दीड दिवस फलंदाजी करत साडेपाचशे धावांचा टप्पा सहज पार केला. भारतासाठी कर्णधार शुभमन गिल आणि उपकर्णधार केएल राहुलने शतक केले. तसेच, फिरकी अष्टपैलू मानव सुतार हा देखील पदार्पणातच चमकला. तर, अफगाणिस्तानचा अर्धा संघ तंबूत परतला असून, त्यांना फॉलो-ऑन टाळण्यासाठी अजून २५२ धावांची गरज आहे.




या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी जैस्वाल पहिल्याच सत्रात २४ धावांवर बाद झाला. त्यानंतर केएल राहुल आणि साई सुदर्शन यांनी १३९ धावांची भागीदारी केली. यावेळी दोघांनीही अर्धशतके पूर्ण केली. सुदर्शन शतकाच्या दिशेनेही वाटचाल कर असताना तो ८१ धावांची खेळी करून बाद झाला. त्यानंतर केएल राहुलने शतकही पूर्ण केले आणि तो बाद झाला. त्यानंतर गिलला रिषभ पंतची साथ मिळली. त्यानेही पहिल्याच दिवशी शतक पूर्ण केले. तसेच, त्याने कर्णधार म्हणून १००० धावाही पूर्ण केल्या. दरम्यान, तो फलंदाजी करत असताना त्याला पंतने भक्कम साथ दिली होती. पहिला दिवस संपेपर्यंत पंतही अर्धशतक करून नाबाद होता. भारताने पहिल्या दिवशी ३ बाद ३६८ धावा केल्या होत्या.

दुसऱ्या दिवशीही पंत आणि गिलने सुरुवात चांगली केली. मात्र, पहिल्या सत्रात शुभमन गिल १२६ धावांवर बाद झाला. जुरेल देखील १९ धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यानंतर पंतही ८१ धावांची खेळी करून परतला. वॉशिंग्टनने मानव सुतारसह ५४ धावांची भागीदारी करत संघाला ५०० धावांचा टप्पा पार करून दिला. परंतु, मानव २८ धावांवर बाद झाला. मोहम्मद सिराज आक्रमक खेळी करत २२ धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यानंतर वॉशिंग्टनने अर्धशतकही पूर्ण केले. त्याच्या अर्धशतकानंतर मात्र भारताचा कर्णधार शुभमन गिलने भारताचा पहिला डाव घोषित केला. त्यावेळी भारताच्या १२७ षटकात ८ बाद ५६४ धावा झाल्या होत्या. वॉशिंग्टन सुंदर नाबाद ५२ धावा झाल्या होत्या. यावेळी अफगाणिस्तानकडून सलीम साफीने सर्वाधिक ६ बळी घेतले, तर झियाउर रहमान शरीफी आणि कर्णधार हशमतुल्लाह शाहिदी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा अफगाणिस्तानचा संघ अडचणीत असून, त्यांनी ११३ धावांतच ५ गडी गमावले आहेत. भारतीय संघाकडे हा सामना मोठ्या फरकाने जिंकण्याची सुवर्णसंधी आहे. भारतीय संघाला दुसऱ्या डावात फलंदाजी करण्याची गरज पडू नये आणि तरीही त्यांनी हा सामना मोठ्या फरकाने जिंकावा, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अफगाणिस्तानचा संघ सध्या 'फॉलो-ऑन'च्या फेऱ्यात अडकला आहे. कसोटी क्रिकेटच्या नियमानुसार, जर पहिल्या डावात एका संघाने दुसऱ्या संघापेक्षा २०० किंवा त्यापेक्षा जास्त धावांची आघाडी घेतली, तर ते प्रतिस्पर्धी संघाला 'फॉलो-ऑन' देऊन पुन्हा फलंदाजी करायला भाग पाडू शकतात. त्यामुळे, फॉलो-ऑन टाळण्यासाठी अफगाणिस्तानला पहिल्या डावात किमान ३६५ धावा करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अजून २५२ धावांची गरज आहे.



## स्टेट शूटिंगमध्ये कुलाबाचे यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कॅप्टन एस.जे. इझेकल मेमोरियल महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिप ही महाराष्ट्रातील एक नामांकित, राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धा आहे. महाराष्ट्र रायफल असो.तर्फे ही स्पर्धा आयोजित केली जाते. हौशी आणि नवशिक्या नेमबाजांना राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांसाठी पात्र ठरण्यासाठी हे एक महत्त्वाचे पहिले पाऊल ठरते. यावर्षीच्या स्पर्धेत कुलाबा रायफल व पिस्टल शूटिंग क्लबकडून खेळताना मल्हार कदम याने १० मीटर एयर राइफल या प्रकारात ४०० पैकी ३८२ गुण मिळवत युथ, सब युथ व ज्युनियर या तिन्ही विभागात प्रत्येकी एक अशी एकूण ३ कांस्यपदके मिळवली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ महाराष्ट्र रायफल असो.च्या वरळी रेंजवर पार पडला. बक्षीस वितरणासाठी महाराष्ट्र रायफल असो.चे अध्यक्ष तथा अर्जुन पुरस्कार विजेते अशोक पंडित, सचिव शीला कानूंगो, सदस्य चंद्रकांत पुजारी, विधानपरिषद सदस्य दुष्यंत चतुर्वेदी आदी मान्यवर उपस्थित होते. मल्हार कदम हा सेंट मेरी हायस्कूल मधे इयत्ता सातवीत शिकत असून त्याला प्रशिक्षक योगेश गडमाळे, मेहुल राठोड, मंदार गडकरी व यतिराज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारताच्या 'अ' संघाची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि श्रीलंका यांच्यात दोन प्रथम श्रेणी सामन्यांच्या मालिकेसाठी भारत 'अ' संघाची घोषणा करण्यात आली आहे. या लाल चेंडूच्या मालिकेसाठी ध्रुव जुरेलकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, तर देवदत्त पडिक्कलला उपकर्णधारपद देण्यात आले आहे. बीसीसीआयने या दौऱ्यासाठी १५ सदस्यीय संघाची निवड केली आहे. ही मालिका दि.२५ जून ते ५ जुलै या कालावधीत खेळली जाणार आहे. त्यामध्ये जम्मू आणि काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीचा १५ सदस्यीय संघात समावेश करण्यात आला आहे. डावखुरा फलंदाज साई सुदर्शन, मधल्या फळीतील फलंदाज ऋतुराज गायकवाड आणि वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज यांसारख्या अनुभवी खेळाडूंचाही या संघात समावेश आहे. पहिला सामना दि.२५ जून रोजी गॉल येथे सुरू होईल, तर दुसरा सामना दि.२ जुलैपासून त्याच मैदानावर खेळवला जाईल. या मालिकेत चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आगामी काळात भारतीय वरिष्ठ कसोटी संघात स्थान मिळवण्याची संधी असू शकते. श्रीलंका 'अ' संघाविरुद्धची ही दोन सामन्यांची मालिका ऑगस्टमध्ये श्रीलंकेतच होणाऱ्या भारताच्या कसोटी मालिकेच्या तयारीसाठी महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे निवडकर्ते आणि संघ व्यवस्थापनाचे लक्ष या मालिकेतील युवा खेळाडूंच्या कामगिरीवर असणार आहे. या संघात ध्रुव जुरेल (कर्णधार व विकेटकीपर), साई सुदर्शन, आयुष पांडे, देवदत्त पडिक्कल (उपकर्णधार), ऋतुराज गायकवाड, हर्ष दुबे, सरांश जैन, गुरनूर ब्रार, आकिब नबी, यश ठाकूर, अंशुल कंबोज, एन. जगदीसन, राकेश, अन्सारी आणि इतर खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे.

## मीरा अँड्रिवाने पटकावले जेतेपद

**नवी दिल्ली :** रशियाच्या १९ वर्षीय मीरा अँड्रिवा हिने पात्रता फेरीतून अंतिम फेरीत धडक मारणाऱ्या माजा च्वालिन्साकाचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला आणि फ्रेंच टेनिस स्पर्धेमध्ये विजेतेपद मिळवले. मोनिका सेलेसनंतर लहान वयात फ्रेंच स्पर्धा जिंकणारी अँड्रिवा पहिली खेळाडू ठरली. मिराने हा विजय दोन सेटमध्ये मिळवला असला, तरी तिला १ तास २२ मिनिटे लढावे लागले. च्वालिन्सका ही जागतिक क्रमवारीत ११४व्या स्थानावर आहे.

# कुमार गटात धाराशिवची हॅटट्रिक

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र खो-खो असो.च्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असो. व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर पार पडली. यावेळी महाराष्ट्राच्या खो-खो विश्वात पुन्हा एकदा धाराशिवच्या कुमार संघाने वर्चस्व सिद्ध करत सलग तिसरे विजेतेपद पटकावून हॅटट्रिक पूर्ण केली. तर, मुलींच्या गटात सांगलीने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद कायम राखले.



कुमार गटाच्या अंतिम सामन्यात धाराशिवने मुंबई उपनगरवर ३२-२६ अशी ६ गुणांची मात करत २.५० मिनिटे राखून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. मध्यंतरालाच दोन ड्रीम रनच्या जोरावर १८-१२ अशी निर्णायक आघाडी घेत धाराशिवने सामन्यावर पकड मजबूत केली. मुलींच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या सांगलीने ठाण्याचा २७-१९ असा ८ गुणांनी पराभव करत सलग दुसरे विजेतेपद पटकावले. मध्यंतरापर्यंत दोन्ही संघांनी प्रत्येकी ३-३ ड्रीम रन मिळवत ११-११ अशी बरोबरी साधली होती. मात्र, उत्तरार्धात सांगलीने आक्रमणाची गती वाढवत सामना आपल्या बाजूने झुकवला. लघुत्तम आक्रमणाच्या आधारे झालेल्या स्थान निश्चिती सामन्यांमध्ये कुमार गटात सोलापूरने तृतीय, तर पुण्याने चतुर्थ स्थान पटकावले. मुलींच्या गटात धाराशिवने तृतीय, तर यजमान सोलापूरला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले. तसेच, स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूंसाठी दिले जाणारे प्रतिष्ठेचे 'विवेकानंद' आणि 'सावित्री' पुरस्कार अनुक्रमे धाराशिवच्या राज जाधव आणि सांगलीच्या धनश्री तामखेडे यांनी पटकावले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)